# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १८ भाद्र. शके १९४८, बुधवार दि.०९ सप्टेंबर २०२६ ❑ पाने १० ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## वाघिरे महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रतिभा लोणे हिची राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्ण कामगिरी

### तुर्कीतील जागतिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड!, गाझीपूर (उत्तर प्रदेश) येथील राष्ट्रीय स्पर्धेत ३ सुवर्ण व १ रौप्य पदकासह पटकावले सर्वसाधारण विजेतेपद

**ज्योतिर्मय साहित्य**

सासवड शहर : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या येथील वाघिरे महाविद्यालयातील एम. ए. (प्रथम वर्ष, राज्यशास्त्र) विभागातील विद्यार्थिनी प्रतिभा अरुण लोणे हिने उत्तर प्रदेशातील गाझीपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ओपन सिनियर नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६ या राष्ट्रीय स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी केली आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिभाने ३ सुवर्ण आणि १ रौप्य पदक पटकावत सर्वसाधारण सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या ऐतिहासिक कामगिरीच्या बळावर तिची तुर्की येथे होणाऱ्या आगामी जागतिक स्पर्धेसाठी भारतीय संघात अधिकृत निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेतील पदकांची लयलूट :

गाझीपूर येथे पार पडलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील दिग्गज खेळाडूंशी दोन हात करत प्रतिभाने नेत्रदीपक कामगिरी नोंदवली:

स्कॉट : २४० किलो वजन उचलून सुवर्णपदक

बेंच प्रेस : १०२.५ किलो वजन उचलून रौप्यपदक

डेडलिफ्ट : १९२.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक

एकूण (ओव्हरऑल चॅम्पियनशिप) : सुवर्णपदक

यापूर्वी राज्यस्तरीय स्पर्धेतही तिने स्कॉटमध्ये २४० किलो, बेंचप्रेसमध्ये १०० किलो आणि डेडलिफ्टमध्ये १९० किलो असे एकूण तब्बल ५३० किलोग्रॅम वजन उचलून सुवर्णपदक पटकावले होते; तसेच नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय स्पर्धेतही तिने सुवर्ण कामगिरी केली आहे.

ठाणे ते जागतिक व्यासपीठ :

मूळची ठाणे जिल्ह्यातील खडवली गावची रहिवासी असलेली प्रतिभा ही द युनायटेड क्लब, ठाणे येथे प्रशिक्षक अनंत चाळके यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करत आहे. तिच्या या कठोर परिश्रमाचे फळ म्हणून आता ती ९ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत इस्तंबूल (तुर्की) येथे होणाऱ्या वर्ल्ड ओपन इक्विप्ड चॅम्पियनशिप २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

प्रतिभाच्या या जागतिक निवडीबद्दल महाविद्यालयीन स्तरावर वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. बी. यु. माने, डॉ. संजय झगडे, समन्वयक डॉ. नरसिंग गिरी, कार्यालयीन अधीक्षक रवी जाधव आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांनी प्रतिभाचे अभिनंदन केले व तुर्की येथील जागतिक स्पर्धेत भारताचा तिरंगा फडकवण्यासाठी तिला शुभेच्छा दिल्या.



## बाळ गोपाळांचा दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : सिडको एन ४ येथे शालिवाहन शाखेत आदिशक्ती महिला मंडळाच्या वतीने अतिशय उत्साहात दहिहंडी चा कार्यक्रम अती आनंदाने पार पडला त्यात महिला मंडळाच्या सौ. रंजना महाजन, सौ. पातूनकर, सौ. महाजन व आदिशक्ती महिला मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती होती, त्यांत बाल गोपाळ व वस्तीतील महिला, पूरुष उत्साहात व बहूसंख्येने आवर्जून उपस्थित होते. सर्वांनी दहिहंडीचा प्रसाद आनंदाने स्वीकार केला. ॅड. पातूनकर यांच्या मूलाने श्रीकृष्णाची भूमिका पार पाडली.

सौ.रंजना महाजन व सौ. पातूनकर यांच्या उत्साहाने व पूढाकाराने दहीहंडीचा हा कार्यक्रम व्यवस्थीत पार पडला. यावेळी शाखेतील सर्व स्वयंसेवक उपस्थित होते व आदिशक्ती महिला मंडळ सहभागी होत्या याप्रसंगी विशेष सहकार्य गणेश महाजन विजय जोग यांचे लाभले.

## अ. भा. शिव मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी प्रा.वा. ना.आंधळे

### दि.३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे संपन्न होणार संमेलन



**ज्योतिर्मय साहित्य**

मुक्ताईनगर : एरंडोल जि.जळगाव येथील सुप्रसिद्ध कवी तथा समीक्षक प्रा.वा. ना. आंधळे यांची, दि.३ व ४ ऑक्टोबर२०२६ रोजी त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे संपन्न होणाऱ्या दोन दिवसीय चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनाच्या कवी संमेलनाचे अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन केंद्रीय कार्यकारिणीने त्यासंदर्भातील निमंत्रण पत्र त्यांना नुकतेच सुपूर्त केले आहे.

गेल्या चार दशकांपासून अव्याहत काव्यलेखन करणाऱ्या प्रा.आंधळे यांनी पाच वेळा राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या कविसमेलनांचे अध्यक्षपद भूषविले आहे. वृत्तपत्रांपासून निखळ वाङ्मयीन नियतकालिके व दिवाळी अंकांपर्यंत काव्यलेखन करणाऱ्या प्रा.आंधळे यांच्या सृजनाचा यथोचित सन्मान शालेय अभ्यासक्रमांच्या पाठयपुस्तकंपासून तर पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत महाराष्ट्रासह कर्नाटक व गुजरात राज्यातील विद्यापीठांनी व शालेय अभ्यास मंडळांनी केलाय.त्यांची आई! मला जन्म घेऊ दे ही कविता माईल स्टोन झाली असून या कवितेचे इंग्रजीसह तब्बल पंचेचाळीस भारतीय भाषेत उत्स्फूर्त अनुवाद झाले आहेत. सातासमुद्रापार जाणाऱ्या या कवितेला मिळालेला जनाधार पाहता आकाशवाणी, दूरदर्शन, यू ट्यूब चॅनल, वृत्तपत्र या प्रसार माध्यमांनी कवितेची व कवीची घेतलेली दखल प्रा.आंधळे यांच्या लेखन फलश्रुतीची नोंद करणारी आहे. डॉ.म.सु. पगारे लिखित बा, तथागता! या अडीचशे पानी मराठी विशाल कवितेचे अहिराणी बोलीत केलेले भाषांतर भाषा अभ्यासक व समीक्षक यांनी यथोचित गौरविले असून बुद्ध तत्वज्ञानावर आधारित अहिराणी बोलीतील पहिला अनुवादित काव्यग्रंथ म्हणून खान्देशाच्या नकाशात सन्मानाने नोंदवला गेला.

प्रा.आंधळे यांच्या सृजन वाटचालीला मिळणाऱ्या चौफेर यशामुळेच त्यांच्या कवितांवर नुकतीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून दोन संशोधक प्राध्यापकांनीं पीएच.डी संपादन केलीय. सामाजिक बांधीलकीचा वसा जपणाऱ्या प्रा. आंधळे यांच्या लेखणीने दूरदर्शन मुंबई व दूरदर्शन दिल्ली येथून प्रसारित झालेल्या मराठी व हिंदी समाजहितैषी मालिकांसाठीही शीर्षक गीत लेखन करून जन मनापर्यंत आपले सृजन यथोचित पोहचवलेय.

अखिल भारतीय स्तरावर संपन्न होणाऱ्या सदर संमेलनाच्या कवी संमेलन अध्यक्षपदी त्यांची झालेली ही निवड त्यांच्या आजवरच्या लेखन साधनेची फलश्रुती असून त्यांच्या या निवडीचे साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक स्तरातून अभिनंदन होत आहे.

## सण-उत्सव आणि धार्मिक स्थळांमधील आवाजाच्या मर्यादेचा प्रश्न

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

**ज्योतिर्मय साहित्य**

सार्वजनिक कार्यक्रमांमधील डीजे आणि मशिदींवरील भोंगे या दोन्ही गोष्टींमुळे होणारे ध्वनिप्रदूषण हा सध्या महाराष्ट्रात अत्यंत संवेदनशील आणि व्यापक चर्चेचा विषय बनला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे व इतर शहरांमध्ये डीजेमुक्त सण साजरा करण्याबाबत सामाजिक पातळीवर हालचाली सुरू असताना, सामान्य नागरिक आणि विविध संघटनांकडून ''नियम सर्वांना सारखेच असावेत'' अशी आग्रही मागणी केली जात आहे.

भारतामध्ये मशिदींवरील भोंगे आणि सणांमधील डीजे या दोन्ही विषयांवरून होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी वेळोवेळी स्पष्ट नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कोणत्याही धार्मिक स्थळावर किंवा सार्वजनिक कार्यक्रमात लाऊडस्पीकर वापरण्यासाठी प्रशासनाची अधिकृत परवानगी असणे बंधनकारक आहे. तसेच रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाजाच्या वापरावर पूर्ण बंदी आहे.

निवासी, शांतता क्षेत्र (हॉस्पिटल, शाळा परिसर) आणि व्यावसायिक क्षेत्रांसाठी आवाजाची कमाल मर्यादा (डेसिबल) निश्चित केली आहे. भोंगे असो वा डीजे, या मर्यादेचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईची तरतूद आहे.

कायदा कोणत्याही एका धर्मासाठी नसून, मशीद, मंदिर, चर्च किंवा कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात होणाऱ्या आवाजाच्या प्रदूषणाला समान रीतीने लागू होतो. डीजे बंदीची मागणी पुढे येताच मशिदी वरील भोंगळ्या ची मागणी देखील आली आहे.

अनेक नागरिकांचे असे मत आहे की, जर केवळ हिंदू सणांमधील डीजे किंवा पारंपरिक वाद्यांवर निर्बंध आणले जात असतील, तर मशिदींवर वर्षभर दिवसातून पाच वेळा वाजणाऱ्या भोंग्यांवरही त्याच कडकडीतपणे कारवाई व्हायला हवी. ध्वनिप्रदूषणामुळे वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना होणारा त्रास हा कोणत्याही एका धर्मापुरता मर्यादित नसतो. नागरिकांचे आरोग्य, विद्यार्थ्यांचा अभ्यास, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांची शांतता लक्षात घेता सर्व प्रकारच्या आवाजांवर (भोंगे आणि डीजे दोन्ही) कडक निर्बंध असावेत, असे मानणारा मोठा वर्ग आहे. काही घटकांच्या मते, ठराविक मर्यादेत आणि नियमांचे पालन करून धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याची परवानगी असावी.

मशिदींवरील भोंगे आणि त्यातून होणारे ध्वनी प्रदूषण हा सध्या भारतातील कायदा, न्यायव्यवस्था आणि समाजामध्ये अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय बनला आहे. मुंबई उच्च न्यायालय आणि अलाहाबाद उच्च न्यायालय यांसारख्या विविध न्यायालयांनी यावर वेळोवेळी महत्त्वाचे कायदेशीर निवाडे दिले आहेत, ज्यात धार्मिक स्वातंत्र्यापेक्षा नागरिकांच्या शांततेच्या आणि आरोग्याच्या अधिकाराला प्राधान्य देण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, लाऊडस्पीकरवर अजान देणे किंवा भोंगे वाजवणे हा कोणत्याही धर्माचा मूळ किंवा अनिवार्य भाग नाही. त्यामुळे भोंग्यांना परवानगी नाकारल्याने मूलभूत धार्मिक अधिकारांवर गदा येते, असा दावा करता येणार नाही.रुग्णालय, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसराला शांतता क्षेत्र म्हणून घोषित केले जाते. अशा भागात भोंग्यांच्या वापरावर कडक निर्बंध आहेत.तरी देखील या नियमांचे उल्लंघन होत आहे.वाढत्या वादामुळे आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक मुस्लिम संघटना व मशिदींनी स्वतःहून पुढाकार घेतला आहे. काही ठिकाणी अजानसाठी मशीद अजान सारख्या मोबाईल ॲप्सचा वापर सुरू झाला आहे, जेणेकरून इतरांना त्रास होणार नाही.

एकंदरीत, प्रशासनाचा आणि न्यायालयाचा भर हा भोंगे किंवा डीजे पूर्णपणे बंद करण्यापेक्षा, त्यांचा आवाज कायद्याच्या मर्यादेत ठेवण्यावर आणि नागरिकांच्या शांततेच्या अधिकाराचे रक्षण करण्यावर आहे.न्यायालयाच्या नजरेत कायदा सर्वांसाठी समान असला, तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना अनेक कारणांमुळे भेदभाव किंवा असमर्थता दिसून येते.

भोंगे किंवा डीजे हे धार्मिक सण, उत्सव आणि प्रार्थनांशी जोडले गेल्यामुळे पोलीस किंवा प्रशासन अनेकदा कायदा कडकपणे लागू करण्यास कचरतात, जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये अनेकदा मतांच्या राजकारणामुळे अनधिकृत लाऊडस्पीकर किंवा मर्यादेपलीकडे वाजणाऱ्या डीजेवर कारवाई करणे टाळले जाते. नागरिकांमध्ये ध्वनी प्रदूषणामुळे होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक त्रासाबद्दल (जसे की बहिरेपणा, हृदयविकार, मानसिक ताण) पुरेशी जनजागृती नाही.पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ नुसार ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच पोलीस बेकायदेशीर लाऊडस्पीकर आणि डीजे जप्त करू शकतात.



## जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
असा रुसु नको बापा
पिक करपल उभं
मला लागल्यात धापा ||८३४||

अरे बरस पावसा
नको पाहू अंत
दोरी बांधून घशाला
होतो शेतकरी शांत ||८३५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७२

ज्योतिर्मय साहित्य

**न वेचे कदा ग्रंथीचे अर्थ काही ।**
**मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही ।**
**महा घोर संसार शत्रू जिणावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७२।।**

अर्थ : रामनाम घेण्यासाठी पदरचे पैसे खर्च करावे लागत नाहीत. मुखाने रामनाम घेताना काही कष्ट पडत नाहीत. या रामनामाच्या साहाय्याने अत्यंत कठीण अशा संसाररूपी शत्रूवर मात करता येते. त्यासाठी प्रभात समयी श्रीरामाचे चिंतन करावे.


( न वेचे - खर्च करावे लागत नाहीत, ग्रंथीचे - पदरचे, अर्थ - पैसा, घोर - कठीण, जिणावा - जिंकावा )







विवेचन : माणसाची देहबुद्धी फार प्रबळ असते. देहासाठी आणि देहाच्या सुखासाठी जे जे लागेल, ते मिळवण्याच्या प्रयत्नात माणूस असतो. सगळी ऐहिक सुखे उपभोगण्यासाठी पैशाची मोठी गरज असते. त्यामुळे माणूस पैशाला फार जपतो. प्रसंगी देहापेक्षाही पैशाला महत्व देणारी माणसे व्यवहारात पाहायला मिळतात. आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करून ती पैसा मिळवण्याच्या मागे लागलेली असते. सामान्य माणूस स्वतःच्या मौजमजेसाठी हवे तेवढे पैसे खर्च करायला तयार असतो पण दानधर्माची वेळ आली की हात आखडता घेतो. सर्वसामान्य माणसांची ही मानसिकता समर्थ उत्तम प्रकारे जाणून आहेत. म्हणून रामनाम घेण्याबद्दल ते सांगतात की यासाठी पदरचा एक पैसाही खर्च करावा लागत नाही. वरील ओळीचा अर्थ आणखी एका प्रकारे घेता येईल. ते म्हणजे भगवंत प्राप्तीसाठी वेगवेगळे ग्रंथ वाचून त्यांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न सामान्य माणूस करतो. आपली पारमार्थिक बैठक तयार होण्यासाठी आवश्यक त्या ग्रंथांचे वाचन अवश्य करावे. पण तेवढे झाल्यानंतर अधिक ग्रंथ वाचण्यात वेळ न घालवता नामस्मरण करावे. नामस्मरणासाठी ग्रंथ वाचनाची आवश्यकता नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात, ''वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा, येरांनी वाहावा भार माथा...''नुसते पुस्तकी ज्ञान किंवा शब्दपांडित्य महत्त्वाचे नसून, भगवंताच्या नामाची अनुभूती घेणे आणि अंतःकरणात भक्ती बाळगणे हेच वेदांचे खरे सार आहे हेच तुकाराम महाराजांना या ठिकाणी सांगायचे आहे. **(क्रमशः)**





## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍ नम्रता

ज्याच्या अंगी नम्रता असते त्याला कोणत्याही त्रासाला तोंड द्यावे लागत नाही, नम्रता हा असा गुण आहे तो नम्र स्वभावाने कोणालाही जिंकू शकतो. नम्रता ही स्वतःच्या आरोग्यासाठी पण हितकारक असते. नम्रता हे मोठेपणाचे लक्षण आहे.

## प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे



### श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

### ♦ श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



१४) कोटी तीर्थ
या ठिकाणी पूर्वी नारद मुनीचा आश्रम होता. येथे 33 कोटी देवता श्री नर सिंहाची उपासना करण्यासाठी येतात. म्हणून याला कोटी तीर्थ म्हणतात.

१५) गो तीर्थ
काम धेनुने स्वत: इथे भगवान नर सिंहाचा अभिषेक केला. त्यामुळे इथे गोसेवा, गोदान व गो पूजेचे विशेष महत्व सांगितल्या जाते.

१६) भानु तीर्थ
सूर्य नारायणांनी येथे तप करून, दिव्य ज्ञान प्राप्त केले. आरोग्य, तेज, बुद्धी व आयुष्य याच्या वृद्धीसाठी या तीर्थात स्नान करण्याची परंपरा आहे.

१७) चक्र तीर्थ
भगवान विष्णूचे सुदर्शन चक्र येथे विराजमान आहे,अशी श्रद्धा आहे. हे तीर्थ दुष्ट शक्तींचा नाश व धर्म रक्षणाचे प्रतीक मानले जाते.

१८) नाद तीर्थ
या स्थानी ऋषींच्या वेद घोषाचा दिव्य नाद घुमत असे, म्हणून या तीर्थाला नाद तीर्थ म्हणतात. येथे जप ध्यान विशेष फलदायी असते असे मानले जाते.

१९) पाश तीर्थ
भगवंताच्या कृपेने जीव कर्म बंधनाच्या पाशातून मुक्त होतो या तत्त्वाचे प्रतीक म्हणून हे तीर्थ ओळखल्या जाते.

२०) मुसळ तीर्थ
भगवंताच्या दैवी आयुधाच्या स्मृतीने हे तीर्थ प्रसिद्ध झाले. येथे स्नान केल्याने संकटाचा नाश होतो.





### A.I.आणि भ्रमनध्वनीचे चक्र व परिणाम

मित्रांनो भौतिक व तंत्रज्ञान प्रगतीचा फार मोठा वाटा माणसाच्या विकासात आहे हे जरी खरं असलं तरी अनेकदा मर्यादा पार झाले की त्याचा परिणाम होतोच.आजचा विषय तोच आहे. मशीन, तंत्रज्ञान, एआय व मोबाईल! जणू पाच मिनिटं सुध्धा आपण मोकळे राहू शकत नाही का खर तर आपण पिढी तर गोकुळातील.. एकत्र वाढलेली, नात्यागोत्यातून वर आलेली, सहकार्य, गर्व माहिती नसलेली आणि सबका साथ देणारी! पण या मोबाईलवर व ए.आय. वर लॅपटॉप वर चालणारी लोकं बघितली की, सामाजिक नाती, कौटुबिक विश्वासहर्ता व संवाद यावर खूप खोल परिणाम होत आहे, हे विसरू नये. आपण शरिराने तर हजर असतो पण भावनीक दृष्टीकोन बदलत आहे, आपणास काय वाटते? हे वैयक्तिक असूनही स्क्रीनवर फिरणारी बोटे, डोळे बाजूला कोण आहे हे विसरून आपल्यावर, भेटी गाठीवर, संवादावर व प्रसंगी माणूसकीवर वरचढ ठरत आहे. शिष्टाचार व आदर याचा विचार कोणी करत नाही. जेव्हा ही सवय घरापासून ते संस्थापर्यत सामान्य होत जाते तेव्हा व्यक्ती व नात्याच्या भावनीक पैलूंवर खूप आघात होत आहे.आपल्या समोरच्या माणसाची किंमत भावना काडीमोल होता कामा नये. आपले दोन हात जणू पुन्हा बांधले गेले आहेत! याकडे दुर्लक्ष न करता त्या व्यक्तीशी पुन्हा बोला.. संबंध, संवाद वाढवा, सामाजिक सलोखा तेव्हा वाढेल.. तरच घर व संस्थामधे फोनच्या चक्रातून मुक्त झालेले मन, कान, डोळे व सुदृढ समाज दिसेल. आज एवढे पुरे. थांबतो. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना. सुप्रभात.



## केस गळणे थांबवण्यासाठी घरगुती उपाय

ज्योतिर्मय साहित्य


नारळाचं तेल केस गळती थांबवण्यासाठी अतिशय गुणकारी आहे. जर केसांना नारळाच्या तेलाने मसाज केला तर प्रथिनांची क्षती रोखली जाते तसेच केस मऊ आणि सतेज होण्यास मदत होते. नारळाचे दूध डोक्यावर चोळल्यानेही असेच चांगले परिणाम दिसून येतात.

केसांना कांद्याचा रस लावला तरी केसांच्या वाढीस मदत होते आणि पर्यायाने टक्कल कमी होण्यास मदत होते.

मेथी वाटून तिची पाण्यात पेस्ट केली आणि ती केसांना लावली तरी केस गळणे कमी होण्यास मदत होते.

बीट आणि मेंदी पावडर ह्यांना एकत्र पाण्यात कालवून, त्यांची पेस्ट केसाला लावल्यास केस गळने कमी होते.

कोरफड केसांचे गळणे थांबवण्यासाठी अतिशय परिणामकारक आहे. कोरफडीचा गर केसाला लावल्यास केस गळणे थांबते तसेच केसांची वाढ होण्यास मदत होते आणि केस मऊ आणि मजबूत होतात.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

आवळ्याची पावडर आणि लिंबाचा रस डोक्याला लावल्यास केस गळण्याचे प्रमाण कमी होते तसेच केसांना चमक येते.

रोजमेरीचे तेल केसांना लावल्यास केस गळणे कमी होते.

शरीरातील लोहाचे प्रमाण कमी असल्यास केस गळण्याची समस्या उद्भवू शकते. त्यामुळे केस गळण्यावरील एक परिणामकारी उपाय म्हणजे लोहयुक्त पदार्थांचे सेवन करणे.

***

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**सेवा तुझी करताना**

सेवा तुझी करताना
मज आनंद होतो
खरे समाधान लाभते
नेहमीच आपल्या वागण्याने
दुसऱ्या ओठी जेंव्हा
हसू अलवार फुलते

माय-बापात मला
दिसतो देव सदा
मनोभावे पूजा करते
सेवा तुझी करताना
स्वतःला जाते विसरुन
तव चरणी विसावते

# अशोकराव शिंदे यांना 'श्री संत सेना महाराज पुरस्कार' प्रदान

## कात्रजमध्ये संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – श्री काळभैरवनाथ नाभिक संघटना, कात्रज आणि संयोग फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा काशी विश्वेश्वर मंगल कार्यालय येथे मोठ्या श्रद्धेने, उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. संत सेना महाराजांच्या अध्यात्मिक विचारांचे स्मरण, त्यांच्या जीवनकार्याचा गौरव तसेच समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान या सोहळ्याचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेस आदरणीय सद्गुरु श्री सुरेश आण्णा शिंदे महाराज यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संत सेना महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करत उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे स्मरण केले. भक्तिमय वातावरणात झालेल्या या प्रारंभिक सोहळ्यामुळे कार्यक्रमाला आध्यात्मिक आणि सामाजिक आशयाची सुरुवात लाभली.

पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. श्रीपादकन्या सौ. अर्चना रमेशजी शेंडगे यांचे विशेष प्रवचन आयोजित करण्यात आले होते. आपल्या प्रवचनातून त्यांनी श्री संत सेना महाराज यांच्या अध्यात्मिक जीवनपटाचा उलगडा केला. संत सेना महाराजांनी आपल्या आचरणातून मांडलेली भक्ती, कर्म, सेवा, समता आणि माणुसकीची मूल्ये त्यांनी उपस्थितांसमोर प्रभावीपणे मांडली. केवळ धार्मिक भक्तीपुरते संत सेना महाराजांचे कार्य मर्यादित नसून, त्यांच्या जीवनातून समाजाला सदाचार, परिश्रम, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश मिळतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रवचनानंतर उपस्थित मान्यवरांनी श्री संत सेना महाराज यांच्या जीवनकार्य, अध्यात्मिक विचार आणि सामाजिक योगदानावर भाष्य केले. संत सेना महाराजांनी आपल्या काळातील सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर भक्ती आणि कर्म यांचा समन्वय साधत समाजाला विधायक दिशा दिली. त्यांच्या कार्याचे स्मरण हे केवळ पुण्यतिथीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा वर्तमान पिढीने स्वीकार करणे आवश्यक आहे, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला. संत सेना महाराजांच्या कार्याचे महत्त्व आणि त्यांच्या विचारांची आजच्या सामाजिक जीवनातील उपयुक्तता मान्यवरांनी अधोरेखित केली.

**अशोकराव शिंदे यांना 'श्री संत सेना महाराज पुरस्कार'**

श्री संत सेना महाराज पुण्यतिथी तसेच स्वर्गीय मायाताई भगवान शिंदे यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी प्रदान




करण्यात येणारा 'श्री संत सेना महाराज पुरस्कार' यंदा ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर माननीय अशोकराव शिंदे यांना प्रदान करण्यात आला. माननीय श्री भगवानराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा हा पुरस्कार श्री प्रभाकर बाबा कदम व श्री अण्णासाहेब बिडवे यांच्या शुभहस्ते अशोकरावजी शिंदे यांना प्रदान करण्यात आला.

पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी, सन्मानपत्र, ११ हजार रुपये रोख तसेच शाल व श्रीफळ असे होते. सामाजिक बांधिलकी, उल्लेखनीय कार्य आणि समाजोपयोगी योगदानाची दखल घेत अशोकराव शिंदे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचाही गौरव करण्यात आला. सुनीलजी पगारे यांना 'जीवनगौरव पुरस्कार', तर आबा कालेकर यांना 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. तसेच सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील योगदानाबद्दल अण्णासाहेब बिडवे यांचा विशेष गौरव करण्यात आला. महात्मा ज्योतिराव फुले यांची पगडी आणि घोंगडी अर्पण करून त्यांना सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे कार्यक्रमाला सामाजिक कृतज्ञतेची विशेष जोड मिळाली.

या प्रसंगी नगरसेवक श्री संदीपजी बेलदरे, श्री सुरेश महाराज शिंदे, श्री अजय सावळे, सहयोग फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. बेबीताई कडेकर, दीपकजी सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, नाभिक समाजबांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत सेना महाराजांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी आणि पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करण्यासाठी उपस्थितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री भगवानराव शिंदे यांनी केले. त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावीपणे सूत्रसंचालन करत प्रत्येक उपक्रमाची माहिती उपस्थितांना करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री काळभैरवनाथ नाभिक संघटना, कात्रज आणि संयोग फाउंडेशन, पुणे यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शेवटी डॉ. अरविंद झेंडे यांनी आभार मानले. संत सेना महाराजांच्या विचारांचा जागर आणि समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देणाऱ्या या सोहळ्याची सांगता भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली.



## फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा शोध ची प्रेरणा – डॉ. डी. एन. जाधव

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा ही शोध कादंबरीची खरी प्रेरणा आहे, असे प्रतिपादन लेखक डॉ. डी. एन. जाधव यांनी येथे केले. हडकोतील एन-१३ मधील सभागृहात प्रकाशनप्रसंगी काढले.अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजेंद्र शेजूळ होते. पुरस्कार निवड समिती अध्यक्ष सुमन साळवे यांच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. जाधव म्हणाले, ग्रामीण जीवनातील अज्ञान, अंध:कार व अंधश्रद्धा दूर सारून एकसंघ समाज उभा करण्यासाठी, समाजातील अनिष्ट चाली-रितींना पायबंद घालणे मुख्यत्वे हुंडाबळी, बालविवाह, व्यसनाधिनता, जातीयता व जातीयतेच्या नावाखाली होणारा अन्याय, अत्याचार, उपेक्षा यासारख्या विषमतामूलक रूढी -परंपरांना तिलांजली देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली सामाजिक समता प्रस्थापित करणे, हा शोध कादंबरीचा उद्देश आहे.

राजेंद्र शेजूळ म्हणाले, साहित्य हे मानवी मनाचे भरणपोषण करीत असल्याने जीवन समृध्द करीत असते. भारतात प्रेमचंद यांच्या कादंबऱ्यांणी वाचकांना वेड लावले. लेखक डॉ. डी. एन. जाधव यांची कादंबरी वाचकांच्या पसंतीस पडेल.

याप्रसंगी सुभेदार भीमराव साळवे, मुख्याध्यापिका सुनिता गवई, आदर्श शिक्षिका अनिता रणक्षेत्रे, प्रसिद्ध कवयित्री सुनंदा पगारे,आशा पल्हाळ, सविता साळवे, सुखदेव पल्हाळ, जगदीश राकडे, सुदाम मगर, प्रशांत राणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंडित आराक यांनी, तर आभार शिल्पा राणे यांनी मानले.

## एमआयटी पॉलीटेक्निकच्या विद्यार्थ्यांची देवगिरी महानंद डेअरीला औद्योगिक भेट






**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : एमआयटी पॉलीटेक्निक, छत्रपती संभाजीनगर येथील द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या ४५ विद्यार्थ्यांनी गांधेली येथील देवगिरी महानंद डेअरीला औद्योगिक भेट दिली. विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती, आधुनिक यंत्रसामग्री तसेच औद्योगिक कार्यसंस्कृतीची माहिती मिळावी, या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. उत्पादन प्रक्रियेतील विविध टप्पे, यंत्रसामग्रीचा वापर, उत्पादन व्यवस्थापन व गुणवत्ता नियंत्रण याबाबत विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. अभ्यासक्रमातील तांत्रिक ज्ञानाचा प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्रात कसा उपयोग केला जातो, याचा अनुभव विद्यार्थ्यांना या भेटीतून मिळाला.

उद्योग आणि शिक्षणसंस्था यांच्यातील परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देण्यासाठी अशा औद्योगिक भेटी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या औद्योगिक भेटीचे समन्वयक प्रा. व्ही. एन. दुधाटे होते. त्यांच्यासोबत प्रा. व्ही. आर. बोरसकर व प्रा. पी. बी. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळून त्यांच्या तांत्रिक ज्ञानात आणि व्यावसायिक दृष्टिकोनात भर पडली.





सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906


## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे.....

एखाद्या नात्यात फसवणूक झाली असेल, तर नवीन नात्यातही आपण तो जुना अनुभव सोबत घेऊन जातो. घटना संपून गेलेली असते; पण तिचा प्रभाव मात्र आपल्या वर्तमानात टिकून राहतो.

भूतकाळ विसरणे आवश्यक नाही. त्यातून शिकणे आवश्यक आहे.

समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा आपण प्रत्येक नवीन परिस्थितीकडे जुन्या अनुभवांच्या आधारे पाहू लागतो. समोरची व्यक्ती नवीन असू शकते; पण आपली प्रतिक्रिया जुनी असते. घटना नवीन असते; पण मन मात्र त्याच जुन्या वेदनेची पुनरावृत्ती करत असते.

हा फरक जर आपल्या लक्षात आला, तर भूतकाळ त्याच्या जागी राहू शकतो आणि वर्तमान त्याच्या जागी.

स्मृती आपल्यासाठी उपयोगी ठरू शकते; पण आपल्या प्रत्येक अनुभवाची मालकीण होण्याची गरज नाही.

भविष्याच्या कल्पनांच्या पलीकडे

ज्याप्रमाणे भूतकाळ आपल्याला मागे खेचतो, त्याचप्रमाणे भविष्य आपल्याला सतत पुढे खेचत राहते.

उद्या काय होईल? काम कसे चालेल? पैसा पुरेसा असेल का? लोक आपल्याबद्दल काय विचार करतील?—अशा असंख्य प्रश्नांमध्ये मन गुंतून राहते.

योजना करणे आवश्यक आहे; पण चिंता म्हणजे योजना नव्हे. योजना वर्तमानात केली जाते; चिंता मात्र भविष्याच्या कल्पनांमध्ये जगते.

आपण एखाद्या समस्येचे समाधान शोधण्याऐवजी तिचे हजारो संभाव्य परिणाम विचारत राहतो. मनाला वाटते की अधिक विचार केल्याने सुरक्षितता मिळेल; पण अनेकदा अतिविचार केवळ अस्वस्थता वाढवतो.

भविष्य जेव्हा येईल, तेव्हा ते वर्तमान बनूनच येईल.

म्हणून ज्या भविष्याकरिता आपण आजचा क्षण गमावत आहोत, ते भविष्यही शेवटी आजच बनून आपल्या समोर येणार आहे.

भविष्यासाठी तयारी करा; पण भविष्य आत्ताच जगू नका.

चेतनेवर साचलेली धूळ आपल्या अंत:करणात अनेक इच्छा सतत चालू असतात. आपल्याला सन्मान हवा असतो, यश हवे असते, (क्रमश:)

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### चुकांमधून शिकणारेच पुढे जातात

कधी कधी आयुष्यात अशी एखादी रात्र येते...
सगळे झोपलेले असतात.
घरात पूर्ण शांतता असते.
पण आपल्या मनात मात्र भूतकाळ ओरडत असतो.
डोळे मिटले तरी काही चेहरे दिसतात...
काही शब्द कानात घुमतात...
काही प्रसंग पुन्हा पुन्हा आठवतात...
आणि मन हळूच विचारतं—
"त्या दिवशी मी थोडा थांबलो असतो तर?"
"त्या क्षणी मी रागावण्याऐवजी समजून घेतलं असतं तर?"
"मी एकदा माफी मागितली असती तर?"
"मी त्याला वेळ दिला असता तर?"
पण आयुष्यातील काही प्रश्नांना उत्तर मिळत नाही.
कारण...
वेळ पुढे निघून गेलेली असते.
माणसं दूर गेलेली असतात.
काही नाती तुटलेली असतात.
आणि काही माणसं...
फक्त आठवणीत उरलेली असतात. तेव्हा कळतं—
चूक झाली तेव्हा वेदना होत नाही... चूक समजायला उशीर झाला की माणूस आतून तुटतो.
पण आयुष्याची सर्वांत सुंदर गोष्ट माहीत आहे? देव आपल्याला चुका सुधारण्यासाठी नेहमी एक नवीन दिवस देतो.
चूक तुम्हाला आयुष्यभरासाठी खाली पाडू शकते...
किंवा...
तुम्हाला आयुष्यभरासाठी बदलू शकते.
निवड तुमची असते.
काही लोक चूक झाल्यानंतर स्वत:लाच दोष देत राहतात.
वर्षानुवर्षे एका चुकीच्या क्षणात जगत राहतात.
पण विचार करा—
त्या वेळचा तुम्ही आणि आजचा तुम्ही सारखे आहात का? नाही.
त्या वेळचा तुम्ही कमी अनुभवी होता.
कमी समजूतदार होता.
परिस्थिती वेगळी होती. म्हणून चूक झाली.
पण आज तुम्हाला तिची जाणीव होतेय...
याचा अर्थ तुम्ही बदललात.
आणि बदलणं म्हणजेच पुढे जाणं.
एक झाड लहान असताना वाकडं वाढलं.
लोक म्हणाले—
"हे झाड सरळ होणार नाही."
पण माळीने त्याला आधार दिला.
हळूहळू ते सरळ वाढलं.
जुना वाकडेपणा त्याच्या खोडावर कायम राहिला...
पण त्याने त्याची वाढ थांबवली नाही.
आपल्याही आयुष्यातील चुका अशाच असतात.
त्यांचे व्रण कदाचित कायम राहतील.
आठवणी कदाचित अजूनही रडवतील.
पण... (क्रमश:)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

पुढे....

'माळ्याच्या मळ्यामधी पाटाचं पाणी जातं...' या अजरामर गीतात बहिणीच्या या हळव्या भावना किती सुंदर व्यक्त झाल्या आहेत—
"राबतो भाऊराया मातीचं झालं सोनं,
नजर काढू कशी जिवाचं लिंबलोण,
मायेला पूर येतो, धावत मन जातं..." किंवा
"दादाच्या शेतामंदी मोटंच मोटं पाणी,
पाजिते रान सारं मायेची वहिनी..."

बहीण मोठी असो वा लहान, तिच्यात नेहमीच एक लहानशी 'आई' दडलेली असते. 'आई' आणि 'ताई' या शब्दात केवळ एका अक्षराचाच काय तो फरक! पण मायेत काडीचाही फरक नसतो. आईच्या अनुपस्थितीत ताई आपल्या भावाची आई होते. आई कामात असताना भावाची काळजी घेणे, त्याचे विस्कटलेले दप्तर नीट करणे, तो आजारी पडल्यावर त्याच्या उशाशी बसून काळजीने डोक्यावरून हात फिरवणे ही बहिणीची उपजत माया असते. तर भाऊ मोठा असो वा लहान, तो बहिणीचा हक्काचा पाठीराखा आणि संरक्षक असतो. बहिणीच्या डोळ्यात आलेला एक अश्रूही भावाला आतून अस्वस्थ करून जातो. (क्रमश:)

# महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ गणेश लोखंडे यांना प्रदान

## शासन, प्रशासनासह सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; शिर्डीत राज्यस्तरीय सन्मानाने गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर / गोकुळसिंग राजपूत - सोयगाव तालुक्यातील डाभा येथील रहिवासी तथा भाजपाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष आणि माजी सरपंच गणेश एकनाथराव पाटील लोखंडे यांना शासन, प्रशासन, खाजगी तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित कार्यक्रमात गणेश लोखंडे यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

गणेश लोखंडे यांनी मागील पंधरा वर्षांपासून विविध क्षेत्रांत सामाजिक बांधिलकी जपत उल्लेखनीय कार्य केले आहे. शासन, प्रशासन, खाजगी क्षेत्र




तसेच सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी निष्ठा, प्रामाणिकपणा, कार्यतत्परता आणि समाजहिताची जाणीव ठेवून विविध उपक्रम राबविले आहेत.

फरदापूर येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झालेल्या काळात त्यांनी सलग तीन महिने स्वखर्चाने टँकरद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा केला. तसेच मोलखेडा येथे स्वतःच्या मोटार व पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा दिला. फरदापूर गटात स्वच्छता अभियान, डाभा गावात स्वच्छता मोहीम, हागणदारीमुक्त अभियान, वृक्षलागवड, सॅनिटायझेशन, धूरफवारणी आणि शोषखड्डे निर्माण करण्यासह विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

देऊळगाव ते सावळदबारा रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये स्वखर्चाने मुरूम टाकून ते बुजविण्याचे कामही त्यांनी केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यासोबतच गरजेनुसार प्रत्यक्ष मदतीचा हात त्यांनी पुढे केला.

'चला बदल घडवू या...' या ध्येयाने कार्यरत असलेल्या बी द चेंज फाउंडेशनने त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६'साठी त्यांची निवड केली.

या पुरस्कारामुळे डाभा तसेच सावळदबारा परिसरासह सोयगाव तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गणेश लोखंडे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# स्त्री प्रधान लघुपट ''१७ वाइ'' ला ४ पुरस्कार

## मौलाना आझाद रिसर्च सेंटर सभागृहमध्ये एका भव्य कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्री सुरेश तांदळे यांच्या रिफ्लेक्शन फिल्म्स निर्मित ''१७ वाइ'' या लघुपटला रोशनी इंटरनॅशनल फिल्म फ ेस्टिवल मध्ये बेस्ट सोशल फिल्म अवॉर्ड, बेस्ट प्रोड्युसर अवॉर्ड, तसेच वर्ल्ड सिनेमा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल चे बेस्ट सोशल फिल्म अवॉर्ड व बेस्ट प्रोडूसर अवॉर्ड अशा चार पुरस्कारांनी गौरविण्यात आले. या सोहळ्यातील स्पर्धेत ३५ देशातील जवळपास १७०० चित्रपट व लघुपट सहभागी झाले होते त्यामधून या लघुपटचे यश ह कौतुकास्पद आहे.

''१७ वाइ'' हा स्त्री प्रधान लघुपट आहे, या लघुपटात स्त्रीवरील अत्याचाराचे विदारक चित्रण दिग्दर्शकाने दाखवले आहे. आतापर्यंत ३५ पेक्षा जास्त देशात या लघुपटाचे प्रदर्शन झाले आहे व त्यास रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. याची दखल घेत रोशनी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मधून विविध चार पुरस्कारांनी या चित्रपटास गौरविण्यात आले आहे.

''१७वाइ'' हा लघुपट म्हणजे आज समाजात स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचे वास्तव दर्शन आहे, हा लघुपट सर्वांनी बघावा व आपल्या मुलांना कसे संस्कार द्यावेत व त्यांची कशी काळजी घ्यावी म्हणजे पुढे ते समाजात




मजबूतपणे उभे राहू शकतील व चांगले भविष्य घडवू शकतील, काही छोट्याशा चुका आयुष्य बरबाद करण्यास कारणीभूत ठरू शकतात हे या चित्रपटातून दाखवले गेले आहे त्यामुळे अशी कोणतीही चूक आपल्या मुलीकडून घडू नये याची काळजी पालकांनी घेतली पाहिजे हेच दिग्दर्शक या लघु पटातून दाखवून देतो.

या पुरस्कारामुळे श्री तांदळे यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.



# मनोरमा बोराडे आणि गणेश सोमासे यांना एमजीएम शिक्षण विभागाचा आदर्श शिक्षक पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - एमजीएम रेडिओ आणि शिक्षण शास्त्र विभाग एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण शहराच्या आरोग्य सभापती मा. डॉ. सुनिता सोळंके यांच्या हस्ते इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहामध्ये पार पडले. आपल्या ज्योतिर्मय समूहाच्या लेखिका मनोरमा बोराडे यांना याप्रसंगी सन्मानित करण्यात आले .गेल्या वीस वर्षापासून त्या व श्री गणेश सोमासे हे सुदर्शन विद्यालय येथे अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना एमजीएम विद्यापीठात तर्फे सन्मानित करण्यात आले .या प्रसंगी प्रा. अनिता फुलवाडे यांनी शिक्षकांचा परिचय करून देत त्यांच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शहराच्या आरोग्य सभापती माननीय डॉक्टर सुनिता साळुंके ह्या होत्या. याप्रसंगी अनिकेत कदम, मानसोपचार तज्ञ सविता सातपुते यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. रेखा शेळके अधिष्ठाता सामाजिक शास्त्र मानववीद्या शाखा एमजीएम यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. जॉन चेल्लादुराई अधिष्ठाता आंतरविद्या शाखा अभ्यास यांचीही याप्रसंगी उपस्थिती होती. सातपुते मॅडम यांनी मुलांची बदलत चाललेली मानसिकता शिक्षक, पालक आणि तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. एफ एम रेडिओचे शीर्षीकर सर यांनी शिक्षक तसेच शाळांना कसा या एफ एम चा वापर करता येईल यावर मार्गदर्शन केले. हॅप इंटरनॅशनल स्कूल, आरजे इंटरनॅशनल स्कूल, श्री गुरु तेग बहादुर स्कूल ,पीडीएम ,जैन इंटरनॅशनल स्कूल, एबी इंटरनॅशनल स्कूल ,सेंट झेवियर स्कूल ,स्वराज्य मिलिटरी स्कूल ,सांस्कृतिक ग्लोबल स्कूल ,सुदर्शन विद्यालय येथील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला आभार प्रदर्शन अश्विनी मॅडम यांनी केले.

# पोस्टाच्या सेवेत ३७ वर्षांची अविरत कारकीर्द; गोपीनाथ पुजारी यांचा भावपूर्ण सत्कार समारंभ

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर / गोकुळसिंग राजपूत- सावळदबारा : सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील पोस्ट कार्यालयात तब्बल ३७ वर्षे प्रामाणिकपणे व निस्वार्थ भावनेने सेवा बजावणारे गोपीनाथ काशीनाथ पुजारी हे दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. विशेष म्हणजे, त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशीच त्यांचा वाढदिवस असल्याने हा दिवस त्यांच्या कुटुंबीयांसाठी तसेच मित्रपरिवारासाठी दुहेरी आनंदाचा ठरला.

गोपीनाथ पुजारी यांनी दि. १ एप्रिल १९८८ रोजी सावळदबारा येथील पोस्ट कार्यालयात आपल्या सेवेला सुरुवात केली होती. आपल्या ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी सावळदबारा तसेच फर्दापूर परिसरातील नागरिकांना पोस्टाच्या विविध सेवा प्रामाणिकपणे उपलब्ध करून दिल्या. नादा तांडा, चारुतांडा, मोलखेडा, हिवरी टिटवी, पळसखेडा, देव्हारी, डाभा, घाणेगाव तांडा महालब्ध आदी परिसरात त्यांनी पोस्टाच्या माध्यमातून ग्राहकांची सातत्याने सेवा केली.



ग्रामीण भागातील नागरिकांशी आपुलकीचे संबंध निर्माण करत त्यांनी पोस्टाच्या सेवेला केवळ नोकरी न समजता सामाजिक बांधिलकी म्हणून काम केले. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पोस्टाच्या सेवा पोहोचविण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. त्यांच्या शांत, संयमी, मनमिळावू आणि कर्तव्यनिष्ठ स्वभावामुळे परिसरातील नागरिकांमध्ये त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले.

सेवानिवृत्तीच्या निमित्ताने उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, अलकाबाई राजपूत, निलेश चव्हाण (अभियंता, हैद्राबाद) , शुभांगी निलेश चव्हाण आणि उमेश चव्हाण यांनी गोपीनाथ पुजारी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला. यावेळी गोपीनाथ पुजारी व त्यांच्या पत्नी पुष्पाताई पुजारी यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या ३७ वर्षांच्या प्रदीर्घ व निष्ठावान सेवेला यावेळी उपस्थितांनी मनापासून दाद दिली.

सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, निरोगी व सुखसमृद्धीचे जावे तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत,अलकाबाई राजपूत यांच्या कडून देण्यात आल्या. विशेष म्हणजे, सेवानिवृत्तीचा दिवस आणि वाढदिवस एकाच दिवशी आल्याने उपस्थितांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या. त्यामुळे सत्कार सोहळ्याला कौटुंबिक व आपुलकीचे स्वरूप प्राप्त झाले. याप्रसंगी अरुण पुजारी, सोनू पुजारी, दिपाली पुजारी, ज्योती पुजारी, बंटी पुजारी, पारबताबाई चव्हाण यांच्यासह समस्त पुजारी परिवार उपस्थित होता. उपस्थितांनी गोपीनाथ पुजारी यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-५)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



### योजन' म्हणजे किती? प्राचीन मापन आणि आधुनिक रूपांतरण

(पूर्वार्ध)

आता आपण अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आलो आहोत. 'योजन' या प्राचीन मापन एककाचा प्रश्न. येथे अतिशय काळजीपूर्वक मांडणी करणे आवश्यक आहे, कारण याच ठिकाणी अनेकदा प्राचीन ग्रंथांविषयी अतिरंजित दावे केले जातात.

'योजन' म्हणजे किती? प्राचीन मापन आणि आधुनिक रूपांतरण

विष्णुपुराणातील ग्रह-नक्षत्रांच्या अंतरांचा आधुनिक खगोलशास्त्राशी तुलनात्मक अभ्यास करायचा असेल, तर सर्वप्रथम एक मूलभूत प्रश्न सोडवावा लागतो, एक योजन म्हणजे नेमके किती अंतर?

आजच्या किलोमीटर या आधुनिक मापन पद्धतीत एखादे प्राचीन अंतर व्यक्त करणे सोपे वाटते., परंतु प्राचीन भारतीय ग्रंथांतील मापन पद्धतींचा अभ्यास केला असता ही गोष्ट तितकी सरळ नसल्याचे लक्षात येते. 'योजन' हे प्राचीन भारतातील महत्त्वाचे अंतरमापन असले, तरी त्याचे एकच, सर्व ग्रंथांना लागू पडणारे आधुनिक मूल्य निश्चित करता येत नाही.

भारतीय मापन परंपरेत अतिसूक्ष्म एककांपासून मोठ्या अंतरांच्या एककांपर्यंत एक क्रम आढळतो. अंगुल, हस्त, धनुष, क्रोश आणि योजन, अशी विविध मापे विविध संदर्भात वापरली गेली आहेत. मात्र या एककांची प्रत्यक्ष लांबी, त्यांचे परस्पर प्रमाण आणि वापर यांमध्ये ग्रंथ परंपरेनुसार काही फरक दिसतात. म्हणूनच विष्णुपुराणात दिलेले 'एक लाख योजन' आपण आजच्या भाषेत किती किलोमीटर मानावे, हा प्रश्न सरळ गणिताचा नसून ऐतिहासिक मापनपद्धतीचा प्रश्न आहे.

योजनाच्या मूल्यांबाबत आधुनिक अभ्यासात विविध मते आढळतात. काही गणनांमध्ये त्याचे मूल्य साधारण ८ ते ९ मैलांच्या आसपास, म्हणजे अंदाजे १३ ते १४.५ किलोमीटर मानले गेले आहे; तर इतर परंपरांमध्ये त्यापेक्षा वेगळी मूल्ये सुचविली गेलेली आहेत, म्हणून एका विशिष्ट मूल्याला अंतिम आणि निर्विवाद मानणे योग्य नाही. याचा आपल्या विषयावर थेट परिणाम होतो.

उदाहरणार्थ, जर केवळ गणित समजून घेण्यासाठी
१ योजन ≈ १३ किलोमीटर असे गृहीत धरले, तर
१ लाख योजन ≈ १३ लाख किलोमीटर, आणि
२ लाख योजन ≈ २६ लाख किलोमीटर.

परंतु हे केवळ एका निवडलेल्या रूपांतरणावर आधारित उदाहरण आहे. याला विष्णुपुराणातील मापनाचे निश्चित आधुनिक रूपांतर समजू नये. याच कारणामुळे प्राचीन ग्रंथातील संख्यांची आधुनिक विज्ञानाशी तुलना करताना 'गृहीत मापन' आणि 'ग्रंथातील निश्चित मापन' यांमध्ये स्पष्ट भेद करणे आवश्यक आहे.

पृथ्वी-सूर्य अंतराचा प्रश्न

विष्णुपुराणानुसार पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचे अंतर एक लाख योजन सांगितले आहे. आधुनिक खगोलशास्त्रानुसार पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील सरासरी अंतर सुमारे १४.९६ कोटी किलोमीटर आहे. हे अंतर 'खगोलीय एकक' या एककानेही व्यक्त केले जाते.

जर १ योजनाला साधारण १३ किलोमीटर मानले, तर विष्णुपुराणातील एक लाख योजनांचे मूल्य केवळ सुमारे १३ लाख किलोमीटर येते. हे आधुनिक पृथ्वी-सूर्य अंतराच्या तुलनेत खूपच कमी आहे, म्हणजेच, या विशिष्ट रूपांतरणाचा आधार घेतल्यास विष्णुपुराणातील पृथ्वी-सूर्य अंतर आणि आधुनिक खगोलशास्त्रीय अंतर यांच्यात थेट संख्यात्मक साम्य दिसत नाही.

(क्रमश:)

# जन्माष्टमीला मोठी सुरुवात: 'कृष्ण अवतारम' ट्रायलॉजी जगभरात होणार प्रदर्शित

## श्री श्री रविशंकर यांच्या डब्ल्यूएफएसी आणि डॉ. साजन राज कुरुप यांच्या क्रिएटिव्हलँड स्टुडिओजने हातमिळवणी केली

**ज्योतिर्मय साहित्य**

'कृष्णावतारम: पार्ट १ हृदयम' आणि त्याच्या ट्रायलॉजीसाठी क्रिएटिव्हलँड स्टुडिओज, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि वर्ल्ड फोरम फॉर आर्ट अँड कल्चर (डब्ल्यूएफएसी) एकत्र आल्याने हे एक ऐतिहासिक सांस्कृतिक सहकार्य ठरले आहे. हा चित्रपट भगवान श्रीकृष्णांच्या जीवनलीला आणि त्यांच्या दिव्य प्रवासाचे आजवरच्या सर्वोत्तम सिनेमॅटिक सादरीकरणातून दर्शन घडवतो. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचे आशीर्वाद आणि प्रेम यामुळे हा चित्रपट केवळ सिनेमापुरता मर्यादित न राहता एका मोठ्या विश्वाचा भाग बनला आहे, ज्यामध्ये सिनेमा, सीरिज, संगीत, लाइव्ह एक्सपिरियन्सेस, गेम्स, शिक्षण आणि इमर्सिव्ह सांस्कृतिक अनुभवांचा समावेश आहे!

'कृष्णावतारम: पार्ट १ हृदयम', जो 'कृष्णावतारम' ट्रायलॉजीचा पहिला भाग आहे, रिलीज झाल्यानंतर प्रेक्षकांनी त्याला भरभरून प्रेम दिले. या भक्तिमय कथानकाने लाखो हृदयांना स्पर्श केला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. भारतभरातील आपल्या शानदार प्रवासानंतर आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे.

चित्रपटाच्या या खास प्रवासाला आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचे दिव्य आशीर्वाद लाभले आहेत. चित्रपटाने प्रभावित होऊन गुरुदेव प्रोड्यूसर डॉ. साजन राज कुरुप यांच्या क्रिएटिव्हलँडसाठी एक मार्गदर्शक शक्ती म्हणून पुढे आले आहेत. चित्रपटाच्या ग्लोबल प्रेझेंटेशन आणि ट्रायलॉजीला पाठिंबा देत, त्याचा दिव्य संदेश जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते मदत करत आहेत. या जन्माष्टमीच्या निमित्ताने वर्ल्ड फोरम फॉर आर्ट अँड कल्चर (डब्ल्यूएफएसी) आणि डॉ. साजन राज कुरुप यांच्या क्रिएटिव्हलँडने गुरुदेवांच्या उपस्थितीत या सहकार्याला अधिकृत स्वरूप दिले. त्यांनी गुरुदेवांसोबत मेमोरेंडम ऑफ अंडरस्टँडिंगवर स्वाक्षरी केली असून, यापुढे गुरुदेव संपूर्ण टीमला मार्गदर्शन करतील. या महत्त्वपूर्ण सहकार्यामुळे 'कृष्णावतारम'ला जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे आणि अशा प्रकारे हा सिनेमा, कला आणि वारशाच्या जागतिक सांस्कृतिक चळवळीत परिवर्तित होणार आहे. या सहकार्याची सुरुवात चित्रपटाच्या मोठ्या ग्लोबल थिएट्रिकल प्रवासाने होईल. भारतीय प्रवासी तसेच जगभरातील प्रेक्षकांपर्यंत हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू आणि इंग्रजी भाषांमध्ये पोहोचणार आहे.

गुरुदेव श्री श्री रविशंकर यांनी चित्रपटाबद्दल आपले प्रेम व्यक्त करताना म्हटले, ''कृष्ण म्हणजे सर्वात आकर्षक आत्मा. हीच ती दिव्यता आहे जी सर्वाधिक आकर्षित करते; ती ऊर्जा जी प्रत्येक गोष्टीला आपल्याकडे खेचून घेते. जेव्हा तुम्हाला याची




जाणीव होते की तुमचे जीवन आणि हे संपूर्ण विश्व केवळ एक लीला आहे, तेव्हा तुमच्या अंतर्मनात कृष्णाचा जन्म होतो.''

प्रोड्यूसर डॉ. साजन राज कुरुप म्हणाले, ''गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या आशीर्वादाने, ज्यांनी आपल्या कृपेने संपूर्ण जगाला आधार दिला आहे आणि लाखो लोकांचे जीवन बदलले आहे, हा चित्रपट गुरुदेवांच्या चरणी आपले सर्वात योग्य स्थान प्राप्त करतो. 'कृष्ण अवतारम'च्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा प्रत्येक पैलू जगापर्यंत पोहोचवण्याचा आणि आपल्या सांस्कृतिक श्रद्धा जगासमोर मांडण्याचा आम्हाला अभिमान आहे, ज्या आपल्या अस्तित्वाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. 'कृष्ण अवतारम'ला सिनेमा, कला आणि आपल्या वारशाचा उत्सव साजरा करणारी एक जागतिक सांस्कृतिक चळवळ बनवणे, हे आमचे व्हिजन आहे.''

गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या ''वन वर्ल्ड फॅमिली'' (वसुधैव कुटुंबकम्) या दृष्टिकोनातून प्रेरित वर्ल्ड फोरम फॉर आर्ट अँड कल्चर ही एक जागतिक सांस्कृतिक शाखा आहे, जिची स्थापना सप्टेंबर २०२० मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगच्या अंतर्गत करण्यात आली. जगभरातील कलाकार, परफॉर्मर्स आणि कला-रसिकांना एकत्र आणणे हा डब्ल्यूएफएसीचा उद्देश आहे.

स्पष्टपणे सांगायचे झाल्यास, या सर्व उपक्रमांचा उद्देश कृष्णाच्या अनोख्या विश्वात आधुनिक प्रवेशद्वार निर्माण करणे आणि त्याच वेळी ज्या तात्त्विक, कलात्मक आणि सांस्कृतिक परंपरांमधून ही कथा उदयास आली आहे, त्यांच्याशी खोलवर जोडलेले राहणे हा आहे.

'कृष्णावतारम: पार्ट १ हृदयम'चा ग्लोबल प्रवास हा भारतातील या महाकाव्यात्मक सांस्कृतिक कथेला जगभरात पोहोचवण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे. हा केवळ एका चित्रपटापेक्षा खूप मोठा प्रवास आहे; या कथेला एका सांस्कृतिक चळवळीत रूपांतरित करण्याचा हा प्रवास आहे आणि खऱ्या अर्थाने ही केवळ एक सुरुवात आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# विद्यार्थी विकासासाठी भारत विकास परिषदेचे कार्य दिशादर्शक

## 'भारत को जानो' प्रश्नमंजुषेतून सुसंस्कारित भावी पिढी घडण्यास मदत; ज्येष्ठ साहित्यिक शिरीष चिटणीस यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा - विद्यार्थ्यांचा केवळ शैक्षणिक विकास न पाहता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा, अनुभवांचा आणि जिद्दीचा सर्वांगीण विकास होणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून देशाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीय मूल्यांची ओळख करून देण्याचे काम भारत विकास परिषद करीत आहे. या उपक्रमांमुळे सक्षम, सुसंस्कारित आणि आत्मविश्वासू भावी पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल. त्यामुळे भारत विकास परिषद, सातारा शाखेचे विद्यार्थी विकासासाठीचे कार्य दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक शिरीष चिटणीस यांनी केले.

भारत विकास परिषद, सातारा शाखेच्या वतीने आयोजित 'भारत को जानो' लेखी परीक्षा व प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी पोवई नाका येथील आय.एम.एस. सभागृह, माऊली ब्लड बँक येथे हा कार्यक्रम उत्साहात झाला.

यावेळी भारत विकास परिषदेच्या अध्यक्ष सीमा दाते, रिजनल जनरल सेक्रेटरी गिरीश दोषी, ज्येष्ठ मार्गदर्शक सुभाष दोषी, सचिव प्रकाश बडदरे, खजिनदार गोपाळराव काळे, संघटक अनिल काटदरे, प्रांत संपर्क प्रमुख किशोर देशपांडे, शोभा जिरेसाळ, समन्वयक ज्ञानेश्वर गजधरणे, मदन जांभळे, हणमंत नलवडे, राजेंद्र पाटेकर, अजित गुमास्ते, सहभागी शाळांचे मार्गदर्शक शिक्षक, पालक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक शिरीष चिटणीस आपल्या भाषणात पुढे म्हणाले, भारत को जानो प्रश्नमंजुषा व राष्ट्रीय समूहगान स्पर्धा या उपक्रमातून स्वस्थ,समर्थ व सुसंस्कारित भावी पिढी निर्माण होईल.

केवळ शालेय किंवा औपचारिक शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनौपचारिक शिक्षण आणि विविध अनुभवांची अधिक आवश्यकता असते.

मोठ्या शहरांतील मुलांचे मातीशी व मैदानांशी नाते संपत चालले आहे, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मातीशी अजूनही घट्ट नाते जोडलेले आहे. हा त्यांच्यासाठी प्रगतीचा एक वेगळा आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो.

आजच्या काळात केवळ शैक्षणिक गुणांपेक्षा विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महत्त्वाचे झाले आहे. उत्तम व्यक्तिमत्त्व असलेला ७५% गुण मिळवणारा विद्यार्थी मुलाखतीमध्ये पुणे-मुंबईतील ९०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यापेक्षा अधिक सहजतेने यशस्वी होऊ शकतो.

पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही की केवळ श्रीमंतांचीच मुले पुढे जाणार. आज अत्यंत सामान्य कुटुंबातील एखादा लहान विद्यार्थीसुद्धा स्वतःच्या गुणांमुळे एका दिवसात जगात प्रसिद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो.

देशातील ७०% लोक हिंदी बोलतात व वाचतात. मराठी व हिंदीची लिपी देवनागरी असल्याने मराठी मुलांना हिंदी लगेच समजते. भाषेवरून होणारे वाद राजकीय असून, तरुणांनी वाचन संस्कृती वाढवताना मराठीसोबतच हिंदी वाचनाचीही सवय ठेवली पाहिजे.

काहीवेळा आयुष्यात पुरेशा सुविधा न मिळणे हा विद्यार्थ्यांसाठी मोठा फायदा ठरतो, कारण यामुळे कठीण परिस्थितीशी लढा देऊन मार्ग काढण्याची वृत्ती आणि यशाची जिद्द निर्माण होते.

शाळेत विशिष्ट विषयांचे (उदा. संस्कृत किंवा संगीत) शिक्षक नाहीत म्हणून मुलांनी शिक्षण थांबवण्याची गरज नाही, कारण हे सगळे ज्ञान मोबाईलवर उपलब्ध आहे. जसे नागेवाडीच्या सावंत नावाच्या विद्यार्थ्याने ट्रॅक्टर चालवत, घरची गरिबी सांभाळत केवळ यूट्यूबच्या () मदतीने अभ्यास केला आणि पहिल्याच प्रयत्नात मिलिट्री/एअरफोर्सची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली.

विद्यार्थ्यांना आयुष्यात पुढे नेण्यात शिक्षकांचे योगदान सर्वात मोठे असते. जर जागरूक आणि धडपडणारे शिक्षक पाठीशी असतील, तर मुलांच्या प्रगतीला कोणीही रोखू शकत नाही.



कोणत्याही कार्यात यश मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करत राहणे गरजेचे आहे. अब्राहम लिंकन यांच्या अशिक्षित आईने त्यांना सतत पुन्हा प्रयत्न कर म्हणून गणिते सोडवायला लावून अभ्यासासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले होते.

अत्यंत गरीब घरातून आलेल्या माधवी पोरेने स्वतःच्या जिद्दीने जपानी भाषा शिकली. जपानमध्ये असताना तिने वॉशरूममध्ये जाऊन मोबाईलवर मुलाखत दिली आणि आज ती कोट्यवधी रुपयांच्या पॅकेजवर मोठ्या पदावर कार्यरत आहे. योग्य धडपड केल्यास कोणतीही अडचण तुम्हाला रोखू शकत नाही.

कोणत्याही स्पर्धेत केवळ पहिला नंबर मिळवण्यासाठी जाऊ नका. स्पर्धेत प्रत्यक्ष सहभागी होणे आणि प्रमाणपत्र मिळवणे अधिक महत्त्वाचे आहे, कारण या वयात मिळणारे अनौपचारिक अनुभव तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मदत करतात. आता काळ बदलला आहे. मुलांना ज्या क्षेत्रात आवड (पॅशन) आहेमग ते चित्रकला असो, अभिनय असो, नाटक असो किंवा इतर काहीत्यांनी त्याच क्षेत्रात पुढे जावे. आज प्रत्येक क्षेत्रात यशाला भरपूर वाव आहे.

कार्यक्रमाची सुरुवात संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत गायनाने झाली. त्यानंतर भारतमाता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच तुळशीच्या रोपास जलधारा अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. प्रास्ताविकात भारत विकास परिषद, सातारा शाखेच्या अध्यक्ष सीमा दाते यांनी परिषदेची स्थापना, उद्दिष्टे आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी परिषद राबवत असलेल्या विविध उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे शिरीष चिटणीस यांच्या हस्ते 'भारत को जानो' लेखी परीक्षा व प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह, ग्रंथ, प्रमाणपत्र आणि शैक्षणिक साहित्य भेट देऊन गौरविण्यात आले.

> ''केवळ शैक्षणिक गुणांपेक्षा विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व, जिद्द, आत्मविश्वास आणि प्रतिकूल परिस्थितीत मार्ग काढण्याची क्षमता अधिक महत्त्वाची आहे. 'भारत को जानो'सारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत संस्कार, देशभक्ती आणि अनुभव मिळतो. भारत विकास परिषदेचे हे कार्य सक्षम व सुसंस्कारित भावी पिढी घडविण्यासाठी दिशादर्शक ठरेल.''
>
> **- शिरीष चिटणीस,** ज्येष्ठ साहित्यिक

**'भारत को जानो' प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेते**

**वरिष्ठ गट (इयत्ता ९ वी ते १२ वी) :**

- प्रथम क्रमांक : दातार-शेंदुरे इंग्लिश मीडियम स्कूल
- द्वितीय क्रमांक : जि. प. प्राथमिक शाळा, कोडोली
- तृतीय क्रमांक : रंगराव देशमुख विद्यालय, अंबवडे

**कनिष्ठ गट (इयत्ता ६ वी ते ८ वी) :**

- प्रथम क्रमांक : दातार-शेंदुरे इंग्लिश मीडियम स्कूल
- द्वितीय क्रमांक : अनंत इंग्लिश स्कूल, सातारा
- तृतीय क्रमांक : कन्या शाळा, सातारा

यावेळी अनिता घाडगे व सौ. कदम यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन किशोर देशपांडे यांनी केले. आभार प्रदर्शन उपाध्यक्ष डॉ. सुधीर जोशी यांनी केले.

# वाघिरे महाविद्यालयात प्रथम वर्ष बी. व्होक. विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

सासवड : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड येथील बी. व्होक. विभाग अंतर्गत कॉम्प्युटर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, रिटेल मॅनेजमेंट, फूड प्रोसेसिंग अँड टेक्नॉलॉजी या चार विभागाच्या वतीने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रथम व द्वितीय वर्षाचे एकूण १८० विद्यार्थी उपस्थित होते. सदर संपूर्ण कार्याक्रमचे आयोजन हे द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी केले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे सर उपप्राचार्य डॉ. संजय झगडे सर तर समन्वयक डॉ. नरसिंह गिरी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते



महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे सर यांनी मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत कौशल्य विकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाला महत्त्व देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना नोकरी करणारे नाही तर रोजगार देणारे व्यवसायिक बना असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करून उपलब्ध शैक्षणिक व व्यावसायिक संधींचा योग्य उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय झगडे सर यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा, विविध विभाग तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास सांगितले तर वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. नरसिंग गिरी यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाचे महत्त्व पटवून दिले व त्यानुसार भविष्यकाळात या चार विभागांमार्फत कोणकोणते रोजगार निर्माण होऊ शकतात या संदर्भात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमास पर्यटन विभाग प्रमुख प्रा. भूतकर एच. व्ही., रिटेल विभाग प्रमुख प्रा. जगदाळे डी. एम.. संगणक विभाग प्रमुख प्रा. समगीर एस. बी., फूड प्रोसेसिंग विभाग प्रमुख प्रा. गायकवाड पी. एच. तसेच बी. व्होक चे सर्व प्राध्यापक काळे पी. एस., प्रा. निगडे एस. व्ही., प्रा. गायकवाड एन. बी., प्रा. शेवते ए. एन., प्रा. भोसले एन. एस., प्रा. झगडे आर. एस., प्रा. गायकवाड सी. आर. आणि प्रा. जानकर एस. आर. उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. स्वाती समगीर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. ज्ञानेश्वर जगदाळे सर यांनी केले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे कु. गौरी वाडेकर व कु. निकिता यादव या विद्यार्थिनींनी केले.

# उन्नती सोशल फाउंडेशनच्या दहीहंडी कार्यक्रमात भाव - भक्ती पुर्ण नृत्याविष्काररराने रंगत

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या परिसरात दहीहंडी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.




शनिवार दि. ५ रोजी सायंकाळी झालेल्या या महोत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकृष्ण जन्मोत्सव, कृष्ण-राधा रॅम्प वॉक, आकर्षक नृत्याविष्कार, शोभा टीमसोबत कृष्ण-राधेचे विशेष नृत्य, ५६ भोगचे अर्पण आदी कार्यक्रम घेण्यात आले.

आला रे आला, गोविंदा आला आणि गवळ्याच्या पोरींनो, जरा मडकी सांभाळा अशा पारंपरिक गीतांनी उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमाचा परिसरातील महिला, बालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घेतला.

उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होता. भक्ती, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संगम या महोत्सवातून अनुभवायला मिळाला.


याप्रसंगी , उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्ष डॉ. रश्मी मोरे, त्यांच्या सहकारी, उन्नती सोशल फाउंडेशनचे सदस्य, पिंपळे सौदागर मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठवण, साठवण' पुस्तकातून संघ जगून दाखवणाऱ्यांची ओळख, अतुल लिमये यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - व्यक्तीचित्रण हा लोभसवाणा साहित्यप्रकार आहे. मराठी साहित्यामध्येही या साहित्यप्रकाराला मोठी परंपरा लाभलेली आहे. श्री. तात्या जोगळेकर यांनी लिहिलेल्या 'आठवण, साठवण' या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून संघमूल्य जगून दाखवणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची ओळख होते, असे मनोगत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह अतुल लिमये यांनी व्यक्त केले.

संघाचे ज्येष्ठ प्रचारक उदय तथा तात्या जोगळेकर यांनी लिहिलेल्या 'आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची' या पुस्तकाचे प्रकाशन लिमये यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. 'कौशिक आश्रम'तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) निवृत्त विशेष पोलीस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. संघाच्या पश्चिम क्षेत्राचे प्रचार प्रमुख प्रमोद बापट यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




''संघाचा प्रचारक समाजात राहून काम करत असल्यामुळे सर्वच प्रकारची माणसे त्याला भेटत असतात. या सर्वांचे अनुभव तो प्रचारक म्हणून घेत असतो. संघकार्य हे खूप विलक्षण कार्य असल्याने समाजाशी संघप्रचारकाचे नाते जडते. संघकार्य हे पारिवारिक कार्य असल्याचा अनुभव त्याला येतो,'' असे लिमये म्हणाले.

''संघकार्यकर्ता लिहितो, तेव्हा त्याच्या व्यक्तिचित्रणाला त्याच्या ध्येयनिष्ठ जीवनाचाही स्पर्श होतो. तात्या जोगळेकर यांच्या लेखनातील हा धागा पुस्तक वाचताना मनाला निश्चितच भावतो,'' असेही लिमये यांनी सांगितले.

आठवण, साठवण या पुस्तकातून संघ कशा पद्धतीने काम करतो, संघ कशा पद्धतीने कार्यकर्ते घडवतो, याची ओळख होतेच. त्या बरोबरच या पुस्तकाच्या वाचनातून पुढची दिशाही आपल्याला मिळते. या पुस्तकातील सर्व व्यक्तिचित्रणे वाचल्यानंतर संघाचे एक छान मोठे चित्र तयार होते. संघाचे प्रतिबिंब समजून येते. या पुस्तकाच्या वाचनातून संघाच्या पुनः प्रत्ययाचा आनंद मिळाला, असे मनोगत अतुलचंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

तात्या जोगळेकर यांनी केलेले व्यक्तिचित्रण तसेच प्रसंग चित्रण मनाला जसे भावते, तसेच हे पुस्तक वाचून झाल्यानंतरही ही व्यक्तिमत्व आपल्याशी संवाद साधत राहतात, असे बापट म्हणाले. अदिती हर्डीकर यांनी कौटुंबिक प्रसंग सांगून तात्यांच्या सहवासामुळे अनेक चांगले संस्कार झाल्याचे सांगितले. ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

# श्री. दत्तात्रय पदे यांचा ८२ व्या वाढदिवसा निमित्त सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - महर्षी शिक्षण प्र. मंडळ तर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधून सचिव श्री. दत्तात्रय पदे यांचा ५ सप्टेंबर रोजी ८२ व्या वाढदिवसा निमित्त सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा महर्षी विद्यालय एन ४ येथे संपन्न झाला.

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. व्यंकटेश केदारे प्रमुख अतिथी होते. महर्षी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष एस. एम. कुलकर्णी कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. मुख्याध्यापिका सौ. उषा मालोदे व सौ. अनुराधा पदे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वझुरकर यांनी केले. प्रास्ताविक सौ. उषा मालोदे यांनी केले. श्री. केदारे यांनी मनोगत व्यक्त केले. मानपत्राचे वाचन श्री. अंकुश तांबे यांनी केले. अध्यक्ष एस एम कुलकर्णी व श्री. व्यंकटेश केदारे यांच्या हस्ते श्री. पदे यांचा मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सौ. मंदा पदे यांचा ही सत्कार करण्यात आला. महर्षी विद्यालयाच्या शिक्षिकांनी ८१ दिवे ओवाळून त्यांचे औक्षण केले. सत्काराला उत्तर देतांना श्री. दत्तात्रय पदे यांनी मनोगत व्यक्त करून सोहळा आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.



अध्यक्षीय समारोप एस. एम. कुलकर्णी यांनी केला. किलबिल विद्यालयाच्या स्थापने बद्दल माहिती सांगून श्री. पदे यांच्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले. श्री. दत्तात्रय पदे मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाल्या नंतर डॉक्टर प्रभाकर मांडे सरांनी महर्षी शिक्षण मंडळाच्या सचिव पदी त्यांची नियुक्ती केली. ते सतत कार्यरत राहिले, व्यवस्थापन छान सांभाळले, शाळेचा दर्जा उंचावला. त्यांनी विज्ञान नाट्य स्पर्धेसाठी चार नाटकं केली. चारही नाटकांना पारितोषिक प्राप्त झाले. संघटन कसे असावे, सर्वांची मने कशी जिंकावी हे सरांकडून शिकण्यासारखं आहे. सरांनी भारतीय शिक्षण मंडळ देवगिरी प्रांत कार्यवाह म्हणून वीस वर्ष कार्य केले.

याप्रसंगी सरांचे कुटुंबीय मुलगा श्रीकांत व श्रीपाद पदे आणि अश्विनी व मंजू ह्या सुनबाई कार्यक्रमासाठी उपस्थित होते. श्री. बोरीकर, श्री. रंजन गर्गे, श्री.रमेश पांडव, खंडागळे, प्रमोद देव, श्रीकांत पत्की, लक्ष्मीकांत धोंड सर, उदय कहाळेकर, शेख सर, शैलजा देशपांडे, छाया महाजन, विमल तळेगावकर, सुनीता पाठक , श्रीनिवास मुळे, संजीवनी मुळे, चौंडीकर, साधना शहा, नागेश अंकुश, वामनराव देशपांडे, परळीकर, विनायक टाकळकर, शिक्षक, पालक, विद्यार्थी, विद्यार्थिनी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# नमस्कार सर...!

ज्योतिर्मय साहित्य

मी अकराव्या वर्गात शिकत असताना आमचे एक्स्ट्रा क्लासचे एस. एल. देशमुख सर. हे आम्हाला इंग्लिश विषय शिकवायचे. सरांची इंग्लिश म्हणजे रसाळ मधाळ शब्दांची खानच जणू. इतकी सुंदर शिकवणी होती सरांची. सकाळी सातच्या क्लाससाठी आम्ही जवळपास २०० ते ३०० विद्यार्थी होतो. म्हणजे सात ते आठ पंधराचा (सव्वा आठ) एक्स्ट्रा क्लास संपला कि लगेच इंग्रजीचा तास असायचा. इंग्रजी सारखा विषय सर आम्हाला अगदी हसत खेळत, खूप सुंदर सुंदर उदाहरणे आणि त्यांच्याही शैक्षणिक आयुष्यातील उदाहरणे देत शिकवत असत. सर उदाहरणे सांगू लागली कि आम्ही विद्यार्थी जणू सरांच्याच काळात रममाण होत असू. सरांचा तास संपूच नये असं क्लासमधील प्रत्येक विद्यार्थ्यांला वाटत असत. सकाळचा मंद गार वारा, भास्कराची कोवळी सोनेरी किरणे, बाहेरील झाडांच्या पानांचा सळसळणारा आवाज कान तृप्त करत असे.

त्या निसर्गरम्य वातावरणात मनाला अलगुज आतमधून शांतता मिळत होती. आणि त्या रम्य शांत वातावरणात आम्हा विद्यार्थ्यांचं सारं लक्ष केवळ सरांकडेच असायचं. सरांचा तास संपत आला कि आम्हा विद्यार्थ्यांची तोंडं हिरमुसायची. मला गुरुजनांचा आदर करायला फार आवडतो. खरं तर प्रत्येकाने गुरुजनांचा आदर केलाच पाहिजे. कारण, आपल्या आईवडिलांनंतर आपल्याला यशस्वी बनविण्यात शिक्षकांचाच खूप मोठा हात असतो. प्रत्येकाने गुरु आदर हा केलाच पाहिजे. कारण, ते आपले आद्य कर्तव्यच होय.

सकाळी ७ च्या क्लाससाठी जाताना कॉलेजमध्ये सर दिसले की लगेच मी दोन्ही हात जोडून, स्मित हास्य करत, सरांसमोर झुकून ''नमस्कार सर'' म्हटले की काय माहिती पण सर मात्र माझ्याकडे अतिशय कुतुहलाने बघत असत. सर जिथे दिसतील तिथे म्हणजे कॉलेजमध्ये, कुठे बाहेर, मार्केटमध्ये, सरांचं घर आमच्या घराकडेच होतं त्यामुळे आमच्या घरासमोरून सरांचं नेहमी येणं जाणं होतं असायचं. आमच्या घरासमोरून जात असताना मि सरांना आदरपूर्वक नमस्कार करीत असे. अकरावी, बारावी, परत डिग्रीचे तीन वर्ष, परत पोस्ट ग्रॅज्युएशनची दोन वर्षे, अशी एकूण सात वर्ष मी एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेतलं. पण तेवढ्या वर्षाच्या कालावधीत मी मात्र सरांना आदरपूर्वक नमस्कार करत राहिला. मी डिग्री फायनल इयरला (पदवीच्या तिसऱ्या वर्गात) असतानाची ही एक छोटीशी आठवण. मी आणि माझी मैत्रीण राज्यशास्त्र विषयाच्या क्लाससाठी जाऊ लागलो होतो. आम्ही मेन गेटमधून प्रवेश करीत असताना समोरून सर येताना मला दिसले.

मी लगेच माझ्या हातातील सायकलची चाबी पटकन करंगळीत अडकवली. आणि सरांना मी नमस्कार करणार. तेवढ्यात सरांनी त्यांच्या उजव्या हातातील एक छोटी बॅग पटकन डाव्या हातातील मनगटात अडकवली. आणि दोन्ही हात जोडून, थोडेसे झुकून सरांनी मला ''नमस्कार'' केला. ते चित्र



पाहताक्षणी माझ्या डोळ्यात टचकण पाणी आलं. माझे डोळे पाणावले. मी सरांसमोर दोन्ही हात जोडून झूकून तशीच उभी होते. मी म्हणाले, ''सर, अहो काय हे? तुम्ही का हात जोडले? हे चुकीचे आहे सर. तुम्ही गुरु आहात. गुरूंनी आपल्या विद्यार्थ्यांसमोर असे हात जोडू नये. सर, गुरूंना आदरपूर्वक नमस्कार करणे, गुरूंचा आदर करणे, बाळगणे हे तर आम्हा विद्यार्थ्यांचे आद्य कर्तव्य आहे आणि सदैव असते. हे आम्हाला केलेच पाहिजे''. माझ्या या सर्व प्रश्नांवर सरांनी मी आयुष्यभर लक्षात ठेवावं असं एक मार्मिक उत्तर दिलं. सर म्हणाले, ''बेटा तू अकराव्या वर्गात शिकत असल्यापासून मला आदरपूर्वक नमस्कार करतेस. आता तू पदवीच्या तिसऱ्या वर्षात शिकत आहेस. गेली पाच वर्षे झाली. तू मला आदराने नमस्कार करतेस. इतक्या वर्षापासून माझा आदर करते आहेस. तो मी खुप जवळून बघत आलोय. तु माझं आदरातिथ्य किती आदराने करतेस ते खुप चांगलं जाणून आहे मी. मी जिथे दिसेल तिथे मला आदराने हात जोडून, स्मित हास्य करून, प्रसन्न चेहऱ्याने मला नमस्कार करतेस. मग मी तुझ्या नमस्काराचा आदर करून आज मी स्वतः तुला नमस्कार केला तर काय चुकलं? काय बिघडलं?''. सर माझ्याशी बोलताना माझ्या डोळ्यात अश्रू होते. मी रडत होते. सर माझ्या डोक्यावर हात ठेवत म्हणाले, ''खूप मोठी हो बेटा. मला पाहायचे आहे तुझे यश''. असं म्हणून सर निघून गेले. मी मात्र अबोल, अवाक, निःशब्द झाले होते. सरांच्या पाठाकृतिकडे पाहत क्षणभर तिथेच उभी राहिले. मनात विचार खेळत होते. गुरु म्हणजे आईवडिलांनंतरचं एक सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्व. त्या सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्वात हा ही एक निर्मळ गुण असतो. कि आपले विद्यार्थी आपला मान राखतात, आपल्या गुरुत्वाला श्रेष्ठ मानतात तर मग त्यांच्या मनी असलेली आपल्या बद्दलची ती निर्मळ, नितळ भावना आपण समजून घ्यायलाच हवी.




आपण तर त्यांचे गुरु आहोत, मोठे आहोत. मग आपण एखाद्या विद्यार्थ्यासमोर का म्हणून हात जोडावे?. हा क्षुल्लक विचार मनात न आणता, न ठेवता आपण आपल्या विद्यार्थ्यांचे गुरु आहोत केवळ हे गुरुपण जागे ठेवावे. हे शिकवणारे, हि शिकवण देणारे म्हणजेच आदर्श गुरु. हेच तर असतात गुरु. जिथे द्वेष, मत्सर, अहंभाव नसतो. आपला प्रत्येक विद्यार्थी खूप मोठा व्हावा, यशस्वी व्हावा, त्याने जग जिंकावे. विद्यार्थ्यांप्रती गुरूंची ही पवित्र व निर्मळ भावना असते. माझ्यासोबत असलेली माझी मैत्रीण हे सर्व पाहून आश्चर्यचकित झाली होती. मी हळूहळू पावलांनी क्लासमध्ये गेले. सरांनी स्वतः हुन मला नमस्कार केला. हे मात्र कांही केल्या माझ्या डोक्यातून, विचारातून जातच नव्हते. माझ्या आयुष्यातील सरांचा हा अनुभव तेव्हापासून आजतागायत आत्तापर्यंत मला प्रत्येक क्षणी, रोज आठवतो. आजही तो सरून गेलेला सोनेरी क्षण आठवताच अगदी क्षणात माझे डोळे पाणावतात. आजही माझे सर मला कुठेही जरी भेटले किंवा दिसले कि मी लगेच सरांना ''नमस्कार'' करते. माझ्या आदर्श सरांसाठी मी आजही म्हणते,नमस्कार सर...!

# मुलांना कडक शिक्षा नको

ज्योतिर्मय साहित्य

आजचे जग वेगाने बदलत आहे. बदलत्या काळानुसार पालक व मुलांमधील नातेही बदलणे गरजेचे आहे. अनेकदा मुलांनी ऐकले नाही किंवा एखादी चूक केली, की पालकांचा व शिक्षकांच पारा चढतो. अशावेळेस मुलांना मारणे त्यांच्यावर ओरडणे किंवा त्यांना कडक शारीरिक व मानसिक शिक्षा करणे हे पर्याय निवडले जातात. कडक शिक्षेमुळे खरोखरच मुलांमध्ये सुधारणा होते का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. आंध्र प्रदेश येथील विशाखापट्टणम् भागात अलीकडेच एक अशी दुर्घटना घडली जिने सर्वांचे मन हेलावन टाकले आहे.

ऑगस्ट २०२६ मध्ये आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम येथील एका नामांकित शाळेत गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे एका शिक्षिकेने ६ वर्षांच्या विद्यार्थ्याला वर्गात सर्वांसमोर अपमानित करून कानशिलात लगावली. शिक्षिकेच्या या अमानुष वागणुकीमुळे आणि ओरडण्यामुळे तो विद्यार्थी प्रचंड घाबरला, की त्याला अचानक धाप लागली. खोकला आला आणि तो वर्गातच बेशुद्ध होऊन शिक्षिकेसमोर कोसळला. दुर्दैवाने रूग्णालयात नेण्यापर्वीच त्याचा मृत्यू झाला.

डॉक्टरांच्या मते तीव्र भीती आणि



मानसिक धक्क्यामुळे त्या लहान मुलाचा जीव गेला. या घटनेचा व्हिडिओ समोर आला असून ती शिक्षिका मुलांना त्रास देत असल्याचे दिसत आहे. शाळेतल्या शिक्षिकेने हे वर्तन करणे चुकीचे आहे. शिक्षक किंवा शिक्षिकेने असे वर्तन केल्यास पालकांनी त्वरित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे तक्रार करावी. आपल्या मुलाला शाळेत शारीरिक किंवा मानसिक त्रास होत असल्यास



सौ. माधुरी पळणिटकर,
सातारा. मो. 9921495533

कायद्याचाही आधार घ्यावा, पण सहन करू नये. लहान मुलांचे मन हळवे असते; त्याला आपण जसा आकार देऊ तसे ते घडते. जेव्हा आपण मुलांना कडक शिक्षा करतो, तेव्हा त्यांच्या मनात सुधारणा होण्याऐवजी भीती निर्माण होते. हीच भीती पुढे मुलांच्या स्वभावात नकारात्मकता, आत्मविश्वासाची कमतरता, होण्यास कारणीभूत ठरते. त्याऐवजी जर आपण मुलांनी चूक केल्यावर शांतपणे समजून घेतले तर प्रकरण चिघळत नाही. मुले कधी कधी थकलेली असतात किंवा त्यांना एखादी गोष्ट समजत नसते त्यामुळे आधी त्यांची समस्या ऐकून घेणे महत्त्वाचे ठरते. अभ्यास केला नाही तर मारणे किंवा धमकवण्यापेक्षा आपण गृहपाठ हसतखेळत पूर्ण करूया का असा पर्याय त्यांना द्यावा. मारहाण किंवा कठोर शब्द सहन करणारी मुले भविष्यात स्वतः हिंसक बनतात. त्यांना वाटते की आपली बाजू मांडण्यासाठी किंवा राग व्यक्त करण्यासाठी हिंसा हा एक एकमेव मार्ग आहे. सकारात्मक शिक्षा ज्याला आपण पॉझिटिव्ह डिसिप्लिन म्हणतो ते लावण्याचा प्रयत्न करावा.

कडक शिक्षेऐवजी त्यांचे आवडते गॅजेट काही काळासाठी काढून घेणे. खेळाचा वेळ कमी करणे याला टाइमआउट असे म्हणतात. ज्यामुळे त्यांना चुकीची जाणीव होते. अशा युक्तीचा वापर करावा. मुले शब्दांपेक्षा कृतीतून जास्त शिकतात. बालकांसाठी कायदा आहे.

बालहक्क आणि कायद्यानुसार शाळांमध्ये मुलांना शारीरिक किंवा मानसिक त्रास दिल्यास तो गुन्हा ठरतो. अपत्य हे पालकांच्या काळजाचा तुकडा असते. गेलेला जीव परत येऊ शकत नाही. दुर्दैवी घटनेतील पालकांच्या वाट्याला एका नालायक शिक्षिकेमुळे आयुष्यभराचे दुःख आले आहे.



# विद्यार्थ्यांनो अभ्यासाला ''ओझे'' समजू नका

ज्योतिर्मय साहित्य

वैजापूर/कोपरगाव : शालेय व महाविद्यालययीन शैक्षणिक जीवन विद्यार्थी जीवनाला सुसंस्कृत बनवून जीवनाचे उच्च ध्येय गाठण्यासाठी सहाय्यभूत ठरते, जीवनात आनंद व उत्साह पेरते यास्तव विद्यार्थ्यांनी अभ्यासाला कदापीही'' ओझे'' न समजता अभ्यास हे जीवनाचे अंगभूत साधन समजून आनंददायी शिक्षण घ्यावे व जीवन घडवावे असे प्रतिपादन सोमवार (ता,०७) रोजी सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी व मराठवाड्याचे जेष्ठ कवी व साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील सहावी ते दहावी च्या विद्यार्थ्यांशी ''अभ्यास कसा करावा'' या विषयी संवाद साधतांना केले.ते पुढे म्हणाले की, ''वाचन, लेखन, संभाषण, किंवा श्रवण हे अभ्यासाच्या पायऱ्या असू शकतात पण वरील पायऱ्या म्हणजे अभ्यास नाही तर, विद्यार्थ्यांनी आपल्या क्रमिक पुस्तकातील पाठ, प्रकरण, कविता तसेच गणितीय व वैज्ञानिक विषयांचा सखोल अभ्यास करून त्यातील व्यवहारिकता दैनंदिन जीवनात उतरवून एक आदर्श विद्यार्थी, कर्तव्यदर्शक नागरिक बनणे, शुद्ध व निर्मळ चारित्र्य जपणे हा खरा अभ्यास होय''. या प्रसंगी अध्यक्षस्थानी समता इंटरनॅशनल इंग्लिश माध्यमाच्या शाळेचे प्राचार्य समीर अत्तार होते. संस्थेचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी धोंडीरामसिंह राजपूत यांना निमंत्रित करून विद्यार्थी संवाद घडवून आणला.

# एस् पीज हास्ययोगातर्फे शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - निर्मळ मन, स्वच्छ बुद्धी आणि कधी न कमी होणाऱ्या कार्यशक्तीला बळकटी देणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते आणि यासाठी ५ सप्टेंबर हा दिवस प्रत्येक टप्प्यावर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

मा.श्री सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करताना शिक्षक म्हणजे भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टीकोन मिळत असते.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून एस. पीज. हास्ययोगा परिवार बालयोगी नंदकुमार दत्ताश्रम जुने सांगवी येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला यावेळी

हास्य क्लबचे अध्यक्ष अँड श्री प्रताप साबळे सर यांनी शिक्षक दिन साजरी का करावा याचे सूक्ष्म मार्गदर्शन करताना डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याविषयी भरभरून बोलताना अनेक प्रेरणादायी दाखले दिले. तसेच

समाज विकास विभाग पुणे महानगरपालिका समूह संघटिका सौ.क्रांती जाधव मॅडम यांनी प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,आई ,वडील व शिक्षक यांचे कृतज्ञता म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांनी आसूड या ग्रंथामधील लिहिलेल्या ओळी

विद्याविना मती गेली,
मती विना नीती गेली,
नितीविना गती गेली,
गती विना वित्त गेले,
वित्तविनाशुद्र खचले

इतके अनर्थ एका अविद्येने केले. म्हणूनच गुरु शिक्षक आई वडील हे आपले ज्ञान विद्या देणाऱ्या असून सर्वांनी त्यांचे कृतज्ञता मानावे अशा प्रकारे मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर हास्य परिवार प्रशिक्षक डिकोस्टा प्रफ ुलता यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील हास्य परिवारच्या प्रशिक्षक गीता नायक व वासुदेव गोविंदराव यांनी जिल्हा परिषद शिक्षिका उज्वला नायकुडे मानसतज्ञ लेक्चरर मनाली गंगावणे या शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर लक्ष्मी बोडरे प्रकाश गोवारी यांनीही शिक्षक दिनानिमित्त स्वतःचे अनुभव व्यक्त केले. हास्य क्लब सेशन घेऊन आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली

# वित्तीय साक्षरता हाच आर्थिक स्वातंत्र्याचा पाया- प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी

ज्योतिर्मय साहित्य

नसरापूर - जागतिक साक्षरता दिनाचे औचित्य साधून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर येथील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ''वित्तीय साक्षरता: काळाची गरज'' या विषयावर एक दिवसीय विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. चौधरी यांनी आधुनिक युगात साक्षरतेचा अर्थ केवळ वाचन-लेखनापुरता मर्यादित नसून, जबाबदारीने जीवन जगण्यासाठी आवश्यक व्यावहारिक ज्ञानाचाही त्यात समावेश असावा, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांसाठी वित्तीय साक्षरता हे एक अत्यावश्यक जीवन कौशल्य असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी बचतीची सवय लावावी, गरजा आणि इच्छा यातील फरक ओळखावा, खर्चाचे नियोजन करावे आणि योग्य आर्थिक निर्णय घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. बँकिंग सेवा, डिजिटल पेमेंट्स, गुंतवणूक, विमा, कर प्रणाली, कर्ज व पतपुरवठा याबाबत जागरूकता असणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा



कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाचे कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी डॉ. विजय कदम, विभाग प्रमुख, वाणिज्य विभाग, अमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विंझर, ता. वेल्हे हे साधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. डॉ. कदम यांनी वित्तीय साक्षरतेवर अत्यंत माहितीपूर्ण व व्यावहारिक मार्गदर्शन केले. वित्तीय साक्षरता म्हणजे आर्थिक माहिती समजून घेऊन योग्य आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता, असे त्यांनी सांगितले. अंदाजपत्रक, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक नियोजनाचे महत्त्व विशद करत त्यांनी उत्पन्न व खर्च यांचा समतोल राखण्याचा सल्ला दिला. बचत व गुंतवणूक यातील फरक स्पष्ट करताना गुंतवणूक करण्यापूर्वी जोखीम, परतावा, आर्थिक उद्दिष्टे आणि कालावधी यांचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले. आणीबाणी निधी आणि जबाबदारीने कर्ज घेण्याचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले.

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल वित्तीय साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी ऑनलाईन बँकिंग, मोबाईल बँकिंग, युपीआय यांच्या सुरक्षित वापराबाबत मार्गदर्शन केले. पासवर्ड, पिन, ओटीपी यांसारखी गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये आणि आर्थिक फसवणूक व सायबर धोक्यांपासून सावध राहावे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक *डॉ. सचिन घाडगे यांनी केले.

त्यांनी प्राचार्य, साधन व्यक्ती, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे स्वागत करून वित्तीय साक्षरतेची वर्तमान काळातील गरज विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. जास्मिन शेख, तृतीय वर्ष वाणिज्य हिने आत्मविश्वासाने व सुव्यवस्थितपणे केले, तर आभार प्रदर्शन कु. गायत्री सूर्यवंशी, प्रथम वर्ष वाणिज्य हिने केले. या कार्यक्रमास वाणिज्य व अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# पुस्तकांशी मैत्री करणाऱ्या २१ बालवाचकांचा गौरव

## 'उन्हाळ्याची सुट्टी, पुस्तकांशी गट्टी' उपक्रम; चार शाळांना 'आनंदी वाचनपेटी'ची भेट

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

बीड (सौ. जयश्री अर्जुन मुंडे) : मोबाईल आणि दूरचित्रवाणीच्या वाढत्या आकर्षणाच्या काळात विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या विश्वाकडे वळविण्याचा अभिनव उपक्रम होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. 'उन्हाळ्याची सुट्टी, पुस्तकांशी गट्टी' या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत सातत्याने वाचन करणाऱ्या २१ बालवाचकांचा गौरव करण्यात आला.

आंबेजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केंद्रेवाडी येथे हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. १५ एप्रिल ते १५ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सुट्टीतील वेळ विविध पुस्तकांच्या सहवासात घालविला.

कथा, कविता, चरित्रे, विज्ञान, इतिहास, सामान्यज्ञान अशा विविध विषयांवरील पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचली. नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्याबरोबरच त्यांची कल्पनाशक्ती, आकलनशक्ती, भाषिक क्षमता आणि स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती विकसित होण्यास मदत झाली.

वाचन ही केवळ अभ्यासापुरती मर्यादित बाब नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा आधार आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. उत्कृष्ट वाचन करणाऱ्या २१ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. या गौरवामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातही नियमित वाचन करण्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमास एचएआरसीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, समन्वयक प्रकाश डुबे, डॉ. शैलेश कदम, 'आधार माणुसकीचा'चे संस्थापक अध्यक्ष ॲड. संतोष पवार तसेच पत्रकार प्रशांत बर्दापूरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**चार शाळांच्या हातात पुस्तकांचे विश्व**

विद्यार्थ्यांना केवळ उन्हाळ्याच्या सुट्टीतच नव्हे, तर वर्षभर पुस्तके उपलब्ध व्हावीत, ग्रामीण भागातील शाळांमध्ये वाचनाचे वातावरण निर्माण व्हावे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या आवडीचे पुस्तक सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने चार जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना 'आनंदी वाचनपेटी' देण्यात आली.



यामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील केंद्रेवाडी, सोनवळा आणि दस्तगीरवाडी तसेच धारूर तालुक्यातील चौंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा समावेश आहे.

या वाचनपेट्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरूप विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यात येत आहेत. गोष्टी, चरित्रे, ज्ञानवर्धक साहित्य आणि अवांतर वाचनाच्या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या पलीकडील जग समजून घेण्याची संधी मिळत आहे.

**२०४ शाळांमध्ये पोहोचली वाचनाची चळवळ**

'आनंदी वाचनपेटी' हा उपक्रम केवळ पुस्तकांचे वितरण न राहता ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याची चळवळ बनत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत तब्बल २०४ शाळांना वाचनपेट्या देण्यात आल्या आहेत. शाळेच्या वर्गखोलीतच विविध पुस्तके उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना मोकळ्या वेळेत वाचनाची संधी मिळत आहे. त्यामुळे पुस्तकांशी नाते जोडणारी नवी पिढी घडविण्यास या उपक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका ठरत आहे.

**सहकार्याने उपक्रमाला मिळाली गती**

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयश्री औताडे, जयश्री मुंडे, दीपक बिडवे आणि सूर्यकांत घाटे यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांपर्यंत उपक्रमाची माहिती पोहोचविणे, त्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करणे आणि कार्यक्रमाच्या आयोजनात त्यांनी योगदान दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यकांत घाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक सोळंके यांनी केले. शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईलऐवजी पुस्तक, शाळांमध्ये केवळ अभ्यास नव्हे तर अवांतर वाचन आणि ग्रामीण भागात वाचनाची समृद्ध संस्कृतीया दिशेने 'उन्हाळ्याची सुट्टी, पुस्तकांशी गट्टी' आणि 'आनंदी वाचनपेटी' हे उपक्रम आश्वासक पाऊल ठरत आहेत.

उन्हाळ्याची सुट्टी पुस्तकांशी गट्टी

मोबाईलशी कट्टी पुस्तकांशी दोस्ती

# इको फ्रेंडली शाडू माती पासून गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पाषान पुणे - पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्या सोबतच त्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला आणि हस्त कौशल्याला वाव मिळावा, या उद्देशाने लोकसेवा विद्यालय, पाषान, पुणे येथे शाडू मातीपासून गणपती मूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली.

या उपक्रमासाठी गिरीधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, विकास जोशी, चंद्रकांत जाधव, जगदीश झंवर, दयानंद चिखलकर यांच्या सौजन्याने व शिल्पकार श्री.साताळकर काका, डॉ.वैजनाथ देशमुख, श्रीकांत कुंभार,यामिनी राठी यांनी प्रात्यक्षिक दाखवले.भगवती सेवा आश्रम, जीवन कौशल्य विकास, बाणेर यांच्याकडून शाडू माती उपलब्ध करून देण्यात आली. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीसाठी शाडू माती उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

कार्यशाळेत ४ थी ते ६ वी ४५० विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणपतीची मूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष व कृतीशील मार्गदर्शन केले. माती मळण्यापासून मूर्तीला आकार देणे,



विविध बारकावे घडविणे आणि आकर्षक रूप देणे याबाबत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन करण्यात आले.

इयत्ता चौथी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या हाताने सुंदर गणपती मूर्ती साकारल्या. आपल्या कल्पकतेनुसार मूर्ती घडविताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह आणि आनंद दिसून आला. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या सुबक मूर्तींमधून त्यांची सर्जनशीलता, कलात्मकता आणि हस्तकौशल्य प्रकर्षाने दिसून आले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे शाळेतील शिक्षकांचे नियोजनबद्ध, प्रेरणादायी आणि सक्रिय योगदान लाभले. संस्थेचे प्रणेते श्री. दिपकजी पायगूडे, प्रिंसीपॉल दीपाली मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी कार्यशाळेच्या नियोजनापासून ते विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागा पर्यंत प्रत्येक टप्प्यावर मोलाची भूमिका बजावली.

विद्यार्थ्यांना शाडू मातीचे पर्यावरणीय महत्त्व समजावून सांगणे, त्यांना मूर्ती बनविण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे, प्रत्येक विद्यार्थ्याच्या कल्पकतेला प्रोत्साहन देणे आणि त्यांनी साकारलेल्या मूर्तींचे कौतुक करून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. ''प्रत्येक मुलामध्ये काहीतरी वेगळे करण्याची क्षमता असते'' या भावनेतून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मुक्तपणे प्रयोग करण्याची संधी दिली.

शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यशाळेला केवळ कलात्मक उपक्रमाचे स्वरूप न राहता कृतीतून शिक्षण, पर्यावरण संवर्धन, सर्जनशीलता, सहकार्य आणि संस्कार यांचा सुंदर अनुभव देणाऱ्या उपक्रमाचे रूप प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांच्या हातून साकारलेल्या गणपतीच्या सुंदर मूर्ती हे शिक्षकांच्या प्रयत्नांचे यश ठरले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शाडू मातीच्या पर्यावरणपूरक मूर्तींचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त गणेशोत्सवाची गरज याची जाणीव झाली. स्वतःच्या हाताने गणपतीची मूर्ती घडविताना विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाचा संदेशही आत्मसात केला.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनीही या पर्यावरणपूरक उपक्रमाला मोलाचे सहकार्य देत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

कृतीतून शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास यांचा सुंदर संगम घडविणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व अविस्मरणीय ठरली. मातीला आकार देताना विद्यार्थ्यांनी केवळ गणपतीच्या मूर्ती घडवल्या नाहीत, तर पर्यावरणप्रेम, सर्जनशीलता आणि संस्कारांची सुंदर जडणघडण केली.



## संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त वैजापूरात अभिवादन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

वैजापूर - संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या समकालीन असलेले महान संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त येथील संत सेना महाराज समाजमंदिरात त्यांच्या प्रतिमेचे पूजन,आरती संत सेना महाराज यांचे अभंग गायन व महाप्रसाद असे विविध कार्यक्रम मंगळवार (ता,०८) रोजी आयोजित करून त्यांना अभिवादन करण्यात आले. आरंभी तालुक्याचे आमदार प्रा.रमेश पा.बोरनारे नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, नगरसेवक पारस घाटे, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, नगरसेवक व गट नेते दशरथ बनकर, राजेश गायकवाड, हमीद कुरेशी, संदीप ठोंबरे, ज्ञानेश्वर सिरसाट यांनी संत सेना महाराज यांच्या प्रतिमाचे पूजन करून अभिवादन केले. संत सेना महाराज पुण्यतिथी समितीच्या सर्व पदाधिकारी यांनी आलेल्या मान्यवरांचे शाल टाकुन सत्कार केला.शहरातील नाभिक समाजातील जेष्ठ मंडळी, तसेच तरुण, युवक यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.या वर्षी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# आशाताई-मराठी मनावर राज्य करणारा मंजुळ स्वर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

८ सप्टेंबर हा भारतीय संगीतप्रेमींसाठी अत्यंत भावपूर्ण दिवस. या दिवशी जन्माला आली ती अशी एक स्वरसम्राज्ञी, जिने आपल्या आवाजाने अनेक पिढ्यांचे भावविश्व समृद्ध केले ,त्या म्हणजे आशा भोसले. आशाताईंचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी महाराष्ट्रातील सांगली परिसरात, महान गायक-अभिनेते पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या संगीत परंपरेतील कुटुंबात झाला. वडिलांकडून मिळालेले शास्त्रीय संगीताचे संस्कार आणि बालपणापासूनचा संगीताचा सहवास त्यांच्या आयुष्याची भक्कम पायाभरणी ठरला.

वडिलांच्या निधनानंतर कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटामुळे अगदी लहान वयातच त्यांना गायनाच्या क्षेत्रात उतरावे लागले.

मराठी चित्रपट 'माझा बाळ' साठी १९४३ मध्ये त्यांनी ''चला चला नवबाळा'' हे पहिले व्यावसायिक गाणे गायले. पुढे हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या आवाजाचा स्वतंत्र ठसा उमटवला.

पण आशाताईंची खरी ओळख केवळ ''पार्श्वगायिका'' एवढीच नाही, त्या म्हणजे भावनांचा आवाज.

आशाताईंनी मराठी संगीतात आपल्या स्वरांनी अक्षरशः असंख्य रंग भरले.

''रेशमाच्या रेघांनी'' म्हटले की डोळ्यांसमोर येतो लावणीचा जबरदस्त ठसका, नखरा आणि मराठमोळा बाज

''बुगडी माझी सांडली गं'' म्हटले की लोकसंगीताचा प्रचंड उत्साह जाणवतो.

''तुला पाहते रे'' मध्ये प्रेमाची कोमलता आहे.

''मन वढाय वढाय'' मध्ये बहिणाबाईंच्या शब्दांतील जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.

''अरे संसार संसार'' मध्ये संसाराचे सुख-दुःख आहे.

''ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे'' मध्ये ग्रामीण जीवनातील आर्तता आणि श्रद्धा आहे.

''अजुनी रुसून आहे'' मध्ये प्रेमातील हळवेपणा आहे.

''ही वाट दूर जाते'' मध्ये विरहाची ओढ आहे.शूर आम्ही सरदार सारख्या गीतांमध्ये प्रचंड उत्साह ,जोश आहे.

अश्या कितीतरी गाण्यांमधून आशाताईंनी मराठी भाषेची लय, बोलीची गोडी आणि भावविश्वाची समृद्धी श्रोत्यांपर्यंत पोहोचवली.

त्यांच्या मराठी गाण्यांच्या यादीत ''सांगा मुकुंद कुणी हा पाहिला'', ''डोळ्यात वाच माझ्या'', ''आई म्हणोनी कोणी'', ''बुगडी माझी सांडली गं'', ''तुला पाहते रे'', ''अरे खोप्यामध्ये खोपा'', ''मन वढाय वढाय'' यांसारख्या गीतांचा समावेश आहे.

आशाताईंच्या मराठी गायकीची चर्चा करताना ''रेशमाच्या रेघांनी'' या गाण्याचा उल्लेख अपरिहार्य आहे.

हे गाणे मराठा तितुका मेळवावा या चित्रपटातील असून संगीतकार म्हणून आनंदघन यांचे नाव आहे. १९६३ मध्ये हे गीत प्रसिद्ध झाले.या गाण्यात आशाताईंच्या आवाजातील लाडिकपणा, खट्याळपणा, नखरा ठसका आणि उत्साह मन मोहून टाकतो.

त्यांचा आवाज केवळ गात नाही ,तो जणू अभिनय करतो,श्रोत्याला सोबत गाणं गुणगुणायला भाग पाडतो.

एखाद्या शब्दावर दिलेला जोर, एखाद्या ओळीतील लयबदल, आवाजातील हलकीशी मिश्कीलता,या सगळ्यामुळे त्यांचे गाणे जिवंत होते , श्रोत्यांना नाचवते.

आशाताई म्हणजे फक्त चंचल किंवा नृत्यप्रधान गाणी नव्हेत.

त्यांच्या आवाजात प्रेमाची विलक्षण कोमलताही आहे.

''अजुनी रुसून आहे'',''ही वाट दूर जाते'',

''तुला पाहते रे'' यांसारख्या गीतांमध्ये त्यांच्या आवाजाची एक वेगळीच बाजू ऐकायला मिळते.

प्रेमातील अबोला, विरह, प्रतीक्षा, हुरहूर, लाज हे सगळे भाव त्यांच्या स्वरातून अत्यंत सहजपणे व्यक्त होतात.

हिंदी चित्रपटसृष्टीत आशाताईंनी गायकीचे अक्षरशः नवे पर्व निर्माण केले.

''पिया तू अब तो आजा''''दम मारो दम''

''इन आँखों की मस्ती के''''ये मेरा दिल''




''चैन से हमको कभी''''दिल चीज क्या है''''मेरा कुछ सामान''

''आजा आजा मैं हूँ प्यार तेरा'',अशी कितीतरी गाणी आजही संगीतप्रेमींच्या ओठांवर आहेत.

विशेषतः आर. डी. बर्मन यांच्या संगीताबरोबर आशाताईंची जुळलेली तार आणि मैफल

✍©®
गिरीश खं. वसेकर
नांदेड सिटी, सिंहगड रोड,
पुणे ९४२२६५९४००



विलक्षण होती. तीसरी मंजिलपासून पुढे त्यांच्या आवाजाने हिंदी चित्रपटसंगीताला आधुनिक, प्रयोगशील आणि उत्साही रंग दिला.

उमराव जान चित्रपटातील ''दिल चीज क्या है'' हे गाणे आशाताईंच्या गायकीतील नजाकत आणि शास्त्रीयतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

या गाण्यासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. पुढे इजाजत चित्रपटातील ''मेरा कुछ सामान'' या गीतासाठीही त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.एकीकडे ठसकेबाज लावणी आणि दुसरीकडे गझलेतील

नजाकत हे दोन्ही भावविश्व एवढ्या समर्थपणे साकारावे, हीच आशाताईंच्या अष्टपैलू प्रतिभेची खरी ओळख.

आशाताईंनी केवळ मराठी आणि हिंदीतच नव्हे, तर भारतातील अनेक भाषांमध्ये गायन केले.

त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत विविध प्रकारच्या गीतांना त्यांनी आपला आवाज दिला.चित्रपटगीत, गझल, लावणी, लोकगीत, भक्तिगीत, शास्त्रीय अंगाची गाणी आणि आधुनिक संगीत.

२०११ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने त्यांना संगीत इतिहासातील सर्वाधिक रेकॉर्डिंग करणाऱ्या कलाकार म्हणून मान्यता दिली होती. त्या काळातील नोंदीनुसार त्यांनी हजारो गाणी आणि वीसपेक्षा अधिक भारतीय भाषांमध्ये गायन केले .

आशाताईंच्या कर्तृत्वाला अनेक मोठे पुरस्कार लाभले.

त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार (२०००) आणि पद्मविभूषण (२००८) यांसारखे सर्वोच्च सन्मान मिळाले. पण कोणताही पुरस्कार त्यांच्या लोकप्रियतेची खरी व्याप्ती सांगू शकत नाही.कारण त्यांचा सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे त्यांना रसिकांच्या मनात मिळालेली अढळ जागा आशाताईंच्या आवाजात एक विलक्षण लवचिकता होती,त्या गाण्यानुसार स्वतःचा आवाज त्या सहज बदलत. लावणी आली तर आवाजात ठसका,

प्रेमगीत आले तर कोमलता,

गझल आली तर नजाकत,कव्वाली आली तर जोश,लोकगीत आले तर मातीचा गंध,आणि भावगीत आले तर हळवी आर्तता,असे बदल करणे यात

त्यांचा हातखंडा होता.

म्हणूनच त्यांना एका विशिष्ट चौकटीत बांधणे अशक्य आहे.

आशा भोसले म्हणजे एक गायिका नव्हे

त्या स्वतःमध्ये एक संपूर्ण संगीतविश्व आहेत. अश्या या आशा ताई आज देहाने आपल्यात नाहीत

१२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९२व्या वर्षी आशाताईंचे निधन झाले,पण त्यांचा स्वर आजही जिवंत आहे तो,रेडिओवर ''रेशमाच्या रेघांनी'' येतो तेव्हा आशाताई पुन्हा समोर येतात.

''मन वढाय वढाय'' ऐकताना त्यांच्या आवाजातून बहिणाबाईंचे शब्द पुन्हा जिवंत होतात.

''दिल चीज क्या है'' ऐकताना गझलेची नजाकत जाणवते.

''पिया तू अब तो आजा'' ऐकताना त्यांच्या आवाजातील उत्साह पुन्हा मनाला भिडतो,आणि तेव्हा जाणवते

आशाताई गेल्या नाहीत,त्या आपल्या सुरांमध्ये अजूनही जिवंत आहेत.

अश्या या आशा ताई यांचा जन्म दिवस ०८ सप्टेंबर आहे त्या निमित्ताने ही आठवण.

आशा ताई म्हणजे स्वरांची ज्योत होती,

जी काळाच्या वाऱ्याने विझत नाही सुरांची ती नदी आहे,जी पिढ्यान् पिढ्या वाहत राहील भावनांना आवाज देणारी,

मराठी मातीचा गंध जपणारी, भारतीय संगीताला जगभर नेणारी ही महान गायिका आशा भोसले होत.

८ सप्टेंबर या त्यांच्या जन्मदिनी त्यांना एवढेच म्हणावेसे वाटते

आशाताई, तुमचा आवाज ऐकताना आजही वाटतं ,संगीताला खरंच आत्मा असतो आणि संगीत माणसाला जिवंत ठेवते.

स्व. आशाताईंना

विनम्र अभिवादन

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# प्रश्नच स्वतःचं उत्तर बनून जातो (भाग १)

ज्योतिर्मय साहित्य

शिवांजली शशीकांत जमदाडे ही आमच्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी–कुशी या शाळेमध्ये २०१०–११ साली आठवीमध्ये शिकत होती. पाचवीपासूनच उच्च शिक्षण घेण्याची जिद्द बाळगलेल्या शिवांजलीचा पाचवीमध्ये नवोदय विद्यालयामधील प्रवेश थोड्या मार्कासाठी हुकला होता. इयत्ता आठवी मध्ये लोकमंगल हायस्कूलची शिस्त व अभ्यास याच्या गुणवत्तेवर शिवांजलीला नवोदय विद्यालयामध्ये नववीसाठी प्रवेश मिळाला. नवोदय विद्यालय निवासी शाळा परिपूर्ण सुखसोईयुक्त शाळा असल्याने पूर्वीपासूनच शिवांजलीकडे असलेल्या भाषण, कला, क्रीडा गुणांचा विकास या शाळेमध्ये तिचा झाला. लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी–कुशी या शाळेत सध्या कार्यरत असलेल्या प्रभारी मुख्याध्यापक शशीकांत जमदाडे यांची शिवांजली थोरली कन्या. २०२५ मध्ये 'महाराष्ट्र टीचर ॲटीट्यूड ॲन्ड इंटेलिजन्स टेस्ट' च्या परीक्षेमध्ये शिवांजलीला २०० पैकी १४१ मार्क मिळाले. या मिळालेल्या यशामुळे शिवांजलीला सहावी ते बारावी च्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठीची योग्यता पात्रता मिळाली. नुकत्याच शिक्षक भरतीसाठी झालेल्या परीक्षेमध्ये दोन लाख सतरा हजार उमेदवारांपैकी तीनशे सत्तावन्न उमेदवारांची सातारा जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी निवड



करण्यात आली. यामध्ये शिवांजलीचा नंबर एकावन्न आहे. या आठवड्यात शिवांजली सातारा जिल्हा परिषदेच्या सातारा जिल्ह्यातील कोणत्याही शाळेवर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी रुजु होईल. हे शिवांजलीला मिळालेले यश तिची शिक्षकच होण्याची दुर्दम्य इच्छा आणि त्यासाठी अविरत घेतलेले श्रम यामुळेच मिळाले.

आमच्या नागेवाडी–कुशी याठिकाणी असलेल्या लोकमंगल हायस्कूलमध्ये या यशाबद्दल नुकताच शिवांजलीचा सत्कार करण्यात आला तेंव्हा ती आपल्या भाषणात सांगत होती, ''माझा वडीलांचा शिक्षकी पेशा मला शिक्षकच म्हणून करीअर निवडण्यासाठी उपयोगी पडला. माझ्या आईला गणिताची आवड असल्यामुळे तिने मला लहानपणापासूनच गणिताची आवड निर्माण करून दिली. माझ्या वडीलांनी इंग्रजीसह इतर विषयात मला गती मिळवून दिली.अनेक गोर–गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे माध्यमातून माझ्या वडिलांनी घडविलेले करीअर आणि त्यासाठीचे विद्यार्थी त्यांना देत असलेले आदरयुक्त श्रेय मी बघीतले. शिक्षक म्हणून व्यक्तींना जगभर असलेले महत्व माझ्या वाचनात आले. दुसरे कोणतेही करीअर निवडायचेच नाही या ध्येयाने मी कार्यरत राहून हे यश मिळविले आहे.'' हे शिवांजलीचे मनोगत मी जेव्हा ऐकत होतो तेव्हा समाजामध्ये अशा योग्यतेचे शिक्षक नक्कीच ग्रामीण, निमशहरी भागामधील शाळांतील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करणार याची निश्चिती माझ्या मनात निर्माण झाली. शिवांजलीने नवोदय विद्यालयामध्ये असताना मॅथ्स ऑलिंपीयाड च्या परीक्षा दिल्या. बारावीनंतर तिने बी.एससी ला प्रवेश घेतला. पण हा पदवीचा अभ्यासक्रम शिकत असतानाच शिवांजलीने मोफत पोलीस भरती साठी लागणारे अभ्यासातील सर्व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. एवढेच नव्हे तर एमपीएससी चे गणित आणि बुद्धीमता हे विषयही विद्यार्थ्यांना मोफत शिकविण्याचे कार्य केले. वाई तालुक्यातील शेंदुरजने जिल्हा परिषदेतील



✍ शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

चौथीच्या विद्यार्थांना पाचवीसाठी नवोदय विद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी तसेच चौथीच्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीपच्या परीक्षेमध्ये यश मिळावे यासाठी शिवांजली कायमच जाऊन मोफत क्लासेस घेते.

कोरोनाच्या लॉकडाऊनच्या काळामध्ये एमएससी. करत करत शिवांजलीने कोर्स ऑन कॉम्प्युटर कन्सेप्ट, फुल स्टॅक वेब डेव्हलपमेंट, सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, डेटा सायन्स तसेच पायथॉन डेव्हलपेंट हे कोर्स यशस्वीरित्या चांगल्या गुणाने पूर्ण केले. हे सर्व शिक्षण घेतल्यामुळे शिवांजलीला टी.सी.एस. आणि इन्फोसिस मध्ये मुलाखत होऊन चांगल्या नोकरीची संधीही मिळाली होती. पण शिक्षक म्हणूनच विद्यार्थ्यांसाठी योगदान द्यायचेच हे ध्येय आवडीने ठरविल्यामुळे २०२१ ते २०२३ याकाळात बीएड चा कोर्स शिवांजलीने पूर्ण केला. ती २०२३ मध्ये केंद्राची सी टी ई टी (सेन्ट्रल टीचर इलिजीबिलीटी टेस्ट) परीक्षा उत्तीर्ण झाली.

शिवांजली चांगली कवयित्री पण आहे. तीची एक 'आयुष्याचं गणित' नावाची कविता आहेत्यात ती म्हणते.,

आयुष्य म्हणजे फक्त श्वासांची मोजदाद नाही,
ते तर प्रत्येक क्षणात स्वतःला शोधण्याची कहाणी आहे
कधी बेरीज आनंदाची,
कधी वजाबाकी दुःखांची,
कधी गुणाकार स्वप्नांचा,
तर कधी भागाकार आपल्या माणसांचा
या सगळ्या गणितात,
आपण मात्र उत्तर शोधत राहतो,
आणि कधी कधी
प्रश्नच स्वतःचं उत्तर बनून जातो
पडतो, उठतो, पुन्हा चालतो,
कारण थांबणं हे आयुष्याला कधीच मान्य नसतं
अंधार कितीही गडद असला,
तरी एक छोटासा दिवा पुरेसा असतो,
रस्ता दाखवायला
आयुष्य शिकवतं –
हरलो तरी चालेल,
पण थांबलो तर सगळंच संपेल
म्हणून चालत राहा,
स्वप्नांच्या दिशेने,
कारण शेवटी
जिंकणं महत्त्वाचं नाही,
तर लढणं महत्त्वाचं असतं...

या कवितेप्रमाणेच तीची धडपड आहे. शिवांजलीला शिक्षक होण्याची प्रेरणा शशीकांत जमदाडे ह्या तिच्या वडिलांच्या शिक्षकी पेशामुळे मिळाली. आमच्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी–कुशी या ठिकाणी १७ सप्टेंबर १९९६ रोजी इंग्रजी विषय शिकविण्यासाठी जमदाडे सर आले. त्यांचे इंग्रजी शिकविण्याचे कसब विद्यार्थ्यांना इतके भावले कि, त्यांची इंग्रजी शिक्षक म्हणून मान्यता जिल्हा परिषदेकडून मिळविण्यासाठी जेव्हा मी प्रयत्न चालू केले तेव्हा आमच्या लक्षात आले कि जमदाडे सर बीए–बीएड आहेत पण त्यांचा समाजशास्त्र हा विषय बी.ए. साठी होता. आणि बीएड ला मराठी इतिहास ही मेथड होती. आमच्या सांगण्यावरूनही बाहेरून बी.ए. इंग्रजी विषय घेऊन त्यात पदवी त्यांनी मिळवली. लोकमंगल हायस्कूल नागेवाडी–कुशी या शाळेच्या विद्यार्थ्यांचे ते इंग्रजी, चित्रकला, नाटक, प्रश्नमंजुषा यासाठी आयकॉन ठरले. मी साधना मासिकात विद्याधन ही शिबुलाल फॅमिली फिलांथ्रॉपिक इनिशियेटिव्हज तर्फे राबविण्यात येणारी संपूर्ण भारतातील उच्च शिक्षणासाठीची शिष्यवृत्तीची माहिती वाचली आणि शशीकांत जमदाडे सरांना आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आपण प्रयत्न करा असे सुचविले. या उपक्रमाची स्थापना श्रीमती कुमारी शिबुलाल आणि इन्फोसिसचे माजी सीईओ व सहसंस्थापक एस.डी. शिबुलाल यांनी केली आहे. सन १९९९ पासून या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ भारतातील १८,२६० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला आहे. यामध्ये शशिकांत जमदाडे यांच्या मार्गदर्शन आणि प्रयत्नांमुळे गेल्या दहा वर्षामध्ये आदिती सुनिल सावंत, चेतना पोपट सापते आणि पूजा प्रवीण सावंत या विद्याधन योजनेसाठी विद्यार्थिनी आमच्या शाळेतल्या निवडल्या गेल्या. आदिती सावंत या विद्यार्थीनीला फार्मसीमध्ये हैद्राबाद युनिव्हर्सिटी मध्ये नुकतेच गोल्ड मेडल मिळाले असून चांगली नोकरी मिळाली आहे, तसेच चेतना सापते ही बेंगलोर मध्ये इन्फोसिस कंपनीमध्ये कार्यरत आहे.

***

# अत्यंत तरल चाहुलींचा अनवट नाद

ज्योतिर्मय साहित्य

कवयित्री प्रिया धारूरकर यांचा चाहूलींचे अनवट नाद हा संग्रह नावाप्रमाणेच अत्यंत तरल चाहुलींचा आणि त्या चाहुलींना ऐकू येणाऱ्या अनवट, सवयीच्या बाहेरच्या नादाचा वेध घेणारा संग्रह आहे. हा केवळ कवितांचा संग्रह नाही तर एका स्त्रीने स्वतःच्या देह, मन, मातृत्व, एकटेपणा आणि निर्मिती यांच्याशी केलेला संवाद आहे. प्रिया धारूरकर यांची कविता घोषणाबाज नाही, ती कुजबुजते, पण ती कुजबुज थेट काळजाला हात घालते.

या संग्रहाचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात कविता हा विषय आहे. अनेक कविता कवितेबद्दलच बोलतात. कविता कशी जन्माला येते, ती कवयित्रीपेक्षा कशी स्वतंत्र होते, आणि शेवटी कवयित्रीलाच कशी व्यापून टाकते याचे भान या संग्रहात सतत आहे. मूल्यगर्भा या कवितेत त्या म्हणतात –

ती जो आता
माझ्यातून बाहेर पडून
लिहितेय कविता
ती आहे माझ्यापेक्षा
अगदीच मुक्त आणि स्वतंत्र
(मूल्यगर्भा, पृष्ठ ५९)

हीच निर्मितीची वेदना उपसून या कवितेत अधिक तीव्र होते –

काळजात हात घालून
उपसून काढते ती अक्षरं
तेव्हा
दगडा–खडकांच्या कपारीत गोठलेले
कितीतरी जिवंत झरे
वाहू लागतात
(उपसून, पृष्ठ ६२)


तर क कवितेचा या कवितेत कविता हे जगण्याचे साधन कसे होते याचे अत्यंत प्रांजळ आत्मकथन आहे. कवितेच्या श्वासनिःश्वासातल्या अंतरात जगताना ही ओळ संपूर्ण संग्रहाचा गाभा सांगून जाते. (क कवितेचा, पृष्ठ ६३)

दुसऱ्या बाजूला या संग्रहात रात्रीची, अपरात्रीची, देहाची आणि अस्तित्वाची एक अनामिक बेचैनी आहे. धारूरकर यांची रात्र ही रोमँटिक नाही, ती ताटकळणारी आहे.

ताटकळते सरते प्रहर
या अंगावरून त्या अंगावर होत
बदलत राहतात कूस
पाय पोटाशी घेऊन
डोळ्यात पुनः पुन्हा कोंबत राहतात अंधार
(अपरात्र, पृष्ठ ६५)

हा अंधार केवळ बाहेरचा नाही, तो आतला आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेत देहभान, देहतृष्णा, मौनगर्भी यासारख्या कविता येतात जिथे स्त्रीचा देह केवळ शृंगाराचा विषय न राहता अस्तित्वाच्या खुणा शोधण्याचे क्षेत्र बनतो.

या संग्रहाची भाषा मुक्तछंदातील आहे, पण ती विस्कळीत नाही. शिर्षकात म्हटल्याप्रमाणे तिची लय अनवट आहे, कुठेही अलंकाराचा अतिरेक नाही. प्रतिमा अगदी रोजच्या जगण्यातल्या आहेत




– पिंपळपान, फुलपाखरू, राख, नदी, कातळातून फुटणारा झरा. पण त्या प्रतिमांतून त्या मोठे तत्त्वज्ञान सहजपणे मांडतात.

मला लिहायची आहे एक दीर्घ कविता
श्वासांतापर्यंत
श्वासारंभापासून सुरू झालेली
(अजून शिल्लक आहे सुरवात, पृष्ठ ६७)

या दीर्घ कवितेच्या इच्छेतच पुढे त्या म्हणतात की या कवितेच्या राखेतून फिनिक्स उडेल की नाही याची शाश्वती नाही, पण माती होऊन तिचे विघटन व्हावे आणि त्यातून कितीतरी जीवांना अन्न मिळेल अशी तिची धारणा आहे. ही भूमिका कवयित्रीला केवळ आत्मकेंद्रित न ठेवता विश्वात्मक बनवते.

शेवटी स्पंदनं सारख्या कवितेत नदीच्या रूपकातून त्यांनी स्वतःच्या कवितेच्या प्रवासाचे वर्णन केले आहे –

उगमाच्या वेळी
अल्लड असणारी नदीची स्पंदनं
हळूहळू नवथर होत
समंजस होत गेली
या लिहिल्या कवितेतही
(स्पंदनं, पृष्ठ ६९)

यापूर्वी प्रिया धारूरकर यांचे विदेही आणि अंग भरून वाहणाऱ्या पान्हयातून हे दोन कवितासंग्रह मराठी साहित्य विश्वात दाखल झालेले आहेत. मराठी साहित्य रसिकांनी या दोन्ही संग्रहांचे मनःपूर्वक स्वागत केले. चाहूलींचे अनवट नाद हा मोठ्याने घोषणा न करणारा, पण आत खोलवर रुतून बसणारा संग्रह आहे. तो वाचताना वाटते की ही कविता कुठेतरी आपल्याच आत दबलेल्या एखाद्या न बोललेल्या चाहुलीला शब्द देते आहे. प्रिया धारूरकर यांचा आवाज मराठी स्त्री कवितेत एक स्वतंत्र, चिंतनशील आणि तरीही अतिशय हळवा अनवट नाद म्हणून नक्कीच लक्षात राहील.

कविता संग्रह: चाहुलींचे अनवट नाद
कवयित्री: प्रिया धारूरकर
प्रकाशक: कैलाश पब्लिकेशन्स, छत्रपती संभाजीनगर
मुखपृष्ठ: अनिल जोशी
पृष्ठे: १३४, किंमत: १८० रुपये

****

# २५ हून अधिक वाद्यांचा आवाज एकाच वेळी काढणारे छत्रपती संभाजीनगरचे सुपुत्र

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – शरदकुमार राधाकृष्ण दांडगे यांनी भारतीय तालवाद्यांच्या इतिहासात ओम पंचनाद नावाचा एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक प्रयोग प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वि. वि. चिपळूणकर सभागृह गीता भवन येथे गुरुवार १३ ऑगस्ट रोजी यशस्वीपणे सादर केला.

याप्रसंगी अध्यक्ष प्रमोद बेंडे, सचिव कमलाकर पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती. दिनेश जोशी यांनी कलाकारांचा परिचय करून दिला. प्रमोद बेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शैला मोहनपूरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद सुरडकर यांनी आभार प्रदर्शन केले. सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मैफिलीत शरद दांडगे यांनी स्वतः केवळ १० तबले आणि १ ढोल यांच्या सहाय्याने भारतभरातील तसेच पाश्चात्य देशांतील २५ हून अधिक वेगवेगळ्या वाद्यांचे हुबेहूब आवाज आणि प्रादेशिक शैली एकाच वेळी सादर केली.

ज्येष्ठ नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन त्यांनी दिगंबरा दिगंबरा, गोविंद बोलो हरी गोपाल बोलो, ऐरणीच्या देवा तुला, या गीतावर तबला वादन करून




सर्वांना मंत्र मुग्ध केले. प्रेक्षकांना नुसत्या टाळ्या वाजवायला नाही तर तालावर नाचायला भाग पाडले.

व्हायोलिन वर प्रबोध जोशी यांनी, सिंथ वर विजय मिमरोट व तबल्यावर छोट्या चाणक्य दांडगे याने तितक्याच ताकदीने साथ संगत केली.

एकपात्री जुगलबंदीमध्ये त्यांनी पखवाज, दक्षिण भारतीय मृदंगम, तबला, ढोलक, ढोलकी, खोल, खंजिरी, डफ, संबळ, डमरू, ताशा आणि ओडिसी मर्दल यांसारख्या भारतीय वाद्यांसह; आसामी बिहू ढोल, केरळचा चंदा, पंजाबचा भांगडा ढोल, गुजरातचा कच्छी ढोल, आणि पश्चिम बंगालची ढाक शैली हुबेहूब वाजविली.

याप्रसंगी सौ. सुवर्णा शरदकुमार दांडगे यांनी शंकराचे गीत व आई गिरी नंदिनी हे गीत सादर केले.

# सेवाभावातून नेतृत्वाचा गौरव : बसवराज मंगरुळे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर: श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण श्रीयश परिसरात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भव्य रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीची जाणीवही कृतीतून व्यक्त करण्यात आली.

यावेळी श्रीयश प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोमोडोर सुरेंद्र गोचके यांनी मा. बसवराज मंगरुळे यांना श्रीयश परिवाराच्या वतीने वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



याप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. बसवराज मंगरुळे यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली. शैक्षणिक उत्कृष्टता, कौशल्य विकास, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि नवोपक्रम यांवर भर देत श्रीयश प्रतिष्ठानअंतर्गत सर्व संस्थांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. वाढदिवसानिमित्त श्रीयश आयुर्वेद महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयुर्वेद, फार्मसी, व्यवस्थापन आणि नर्सिंग महाविद्यालयांतील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्व आणि मानवसेवेप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. या कार्यक्रमाला विविध संस्थांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. नेतृत्वाचा गौरव, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणा आणि समाजसेवेचा संदेश यांचा सुंदर संगम घडवणारा हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

# पोरवाल कॉलेजचे बुद्धिबळपटू जिल्हास्तरावर!

ज्योतिर्मय साहित्य

कामठी – येथील स्थानिक एस के पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनि तालुका स्तरीय बुद्धिबळ बाजी मारत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला. क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा ही दिनांक ७/९/२०२६ ला मेरी पोस्ट पिन अकॅडमी स्कूल खसाळा मसाळा कामठी रोड येथे आयोजित करण्यात आली होती यामध्ये एकूण १६ विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांमध्ये भाग घेतला होता. यामध्ये एस के पोरवाल कॉलेजची विद्यार्थिनी रुणाली नागपुरे वयोगट १९ मुली व यथार्थ मेश्राम वयोगट १९ मुले यांनी पाचही राऊंड्सला क्लियर करत आपले स्थान जिल्हास्तराकरिता प्राप्त केले या विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्रदर्शनासाठी कॉलेजच्या प्रा.डॉ मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात सर व उपप्राचार्य व्ही बी वंजारी सर तसेच पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे सर व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# जंगल सफारी.!!

**ज्योतिर्मय साहित्य**

आभाळ भरुन आलेलं होतं, आसमंती काळोख दाटून आलेला होता, जोरदार पाऊस लवकरच बरसणार, अगदी निश्चितच होतं, पाऊस तर बरसायलाच हवां होता पण एक अनामिक शल्य काळजाला बोचत होतं, आता बाहेर पडायचं कसं. लहान म्हणजे प्राथमिकला असलेल्या मुलीला घेऊन बाहेर फिरायला जायचे होते. पण असल्या अनिश्चित वातावरणात बाहेरं पडणं मला तरी संयुक्तीक भासतं नव्हते. कायं करावे या विचारात असतांना समोर टेबलवर असलेल्या बालकवितेच्या पुस्तकावर नजर पडली. मिसेसनी ते आणलं होतं याची माहिती मला होती. इतर घरगुती कामात ती व्यस्त झाल्याने निवांतपणे वाचावं असं तिच्या मनात असावं, पण आता मात्र ते माझे हाती आलेलं होतं. तेवढ्यातच, आमचं बालपण म्हणजे छकुली समोर आली ना,'' अय्या, बघू बघू'' असे म्हणत माझे हातातून पुस्तक जवळपास हिसकूनच ती पाने चाळायला लागली. ''बरं बाई, थोडं हळू, प्रथम तू बघ,'' असे पुटपुटतच मी इतर कामास लागलो. कामाचा म्हणजे निपटारा करुन येवून बघतो तर छकुली अजूनही पुस्तकात डोळे खुपसून होती. मी सुध्दा जवळ जाऊन नाक खुपसून बघायला लागलो. निरनिराळ्या प्राण्यांची आकर्षक चित्रं आणि त्यावर आधारित असलेल्या गेयता पूर्ण असलेल्या कवितेचे पुस्तक प्रथमदर्शनी तरी काहीसे आगळेवेगळे आणि वैशिष्टपूर्ण भासत होते. एव्हाना पावसाच्या जोरदार सरी बरसायला लागल्या होत्या. बाहेर जाण्याचा बेत मी आता मनाशी रद्द केला होता. परंतु कन्या या परिस्थितीतही आपला हट्ट सोडणारं नाही, त्यामुळे तिची समजूत कशी घालावी अशा विचारतच असतांना,'' अय्या, पप्पा किती किती सुंदर प्राणी आणि कविता आहेत हो या संग्रहात '' असे म्हणत ती आईला दाखवायला घेऊन गेली. माझी उत्सुकता ताणल्या गेली परंतु तिच्या हातून ते पुस्तक काढून घेणे एवढं काही सोप नव्हते. तरिसुध्दा आज या बालकविता संग्रहामुळे भर पावसात बाहेर जाणे टळले, हे ही नसे थोडके असे मनाचे समाधान करुन केव्हातरी पुस्तक पहायला मिळेलच याची निश्चिती असल्यामुळे मी सुध्दा थोडा विसावलो. शेवटी पुस्तक कुशीत घेऊनच मुलगी झोपी गेल्याने मी हळुवारपणे अलगद पुस्तक काढून घेतले व अवलोकन करायला लागलो.

ख्यातनाम लेखिका आणि विख्यात कवियित्री ॲड. डॉ.नीता कचवे यांनी लिहीलेले ,''जंगल सफारी,'' नावाचे आकाराला काहीसे मोठे असलेले कवितेचे पुस्तक दिसायला चित्ताकर्षक भासत होते, सोबतीला सप्तरंगात खुललेला अवकाश नी वाघोबा, माकड, लहान मुले अशी समर्पक आणि आकर्षक चित्र असलेले मुखपृष्ठ आत काय दडलेलं असावं याची पूर्वकल्पना देत होते. सुंदर मुखपृष्ठ वाचकांस आत काय असावं याची उत्सुकता जागृत करण्यास सक्षम होते, यात मुळीच शंका नव्हती. मागील पृष्ठ कवयित्री नीता कचवे यांचे विषयी माहिती उजागर करित होते. जिल्हा शिक्षण अधिकारी मा.प्रफुल्ल माधवराव कचवे यांनी अत्यंत प्रभावशाली व शैलीदार पध्दतीने बालसाहित्याची आवश्यकता याचे महत्व विषद केलेले दिसले. हत्तीची दिमाखदार चाल, हरिणाची चपळ झेप, खारुताईची चंचलता व मोर पिसायाची उधळण अशा ओघवत्या व सहजसुंदर काव्यमय भाषेतून पुस्तकातील कवितेचे अंतरंग नजरेसमोर आणलेले होते. कवितेतील निरागसता, सहजता आणि समृध्दता या बाबींनी परिपूर्ण असलेला हा कविता संग्रह बालमनाला जंगलाची नक्कीच अद्भूत सफारी करण्यासाठी योग्य आहे याची क्षणोक्षणी जाणीव व्हायला सुरुवात झाली. कवयित्री नीता कचवे या व्यवसायाने वकील आहेत. तत्पुर्वी त्यांनी आदर्श शिक्षिका म्हणून सेवा दिलेली आहे. सद्य परिस्थितीत बांधिलकी प्रतिष्ठान या माध्यमातून मराठी भाषा साहित्य सेवेचे महत्वपूर्ण कार्य करित आहे. मागील पानावरील असलेला त्यांचा जीवन कामगिरीचा परिचय त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे अनेक विविधांगी पैलू उजागर करतात. एकंदरीत कवियित्री या अनुभवी लेखिका असून कल्पनेतून वास्तविकता शोधणारी सर्जनशील लेखिका आहे ही बाब ध्यानात येते. त्यानी केलेले कार्य या सर्वांची साक्ष पटवितात. कवियित्री यांनी बालमित्रांशी केलेले हितगुज खऱ्या अर्थाने त्यांचे बालमनाशी असलेले भावनिक नाते स्पष्ट करतात. निसर्गाविषयी असलेली आस्था दिसून येते. तसेच सद्य परिस्थितीत होत असलेला मोबाईलचा अतिरेक वापर मुलांची वाचनाची आवड हिरावून घेत आहे, अशी चिंता सुध्दा त्यांचे संवेदनशील मन व्यक्त करते.

कविता संग्रहात एकुण एक्कावन बालकविता समाविष्ट आहे. सावित्रीमाई ही पहिलीच कविता त्याच्या स्त्री मनाची साक्ष देतात.

सावित्रीच्या लेकी आम्ही
सावित्रीचे सुपूत्र
तिनेच दिले आम्हाला
प्रगतीचे सूत्र

वरिल कडव्यामधून त्यांची सावित्रीबाई यांच्या स्त्री शिक्षणाचे महान कार्याविषयी विषयी असलेली आस्था व निष्ठा दिसून येते

पुढीलपानावर मग हत्तीबाप्पा हे शीर्षक असलेली कविता वाचकाचे किंबहूना बालमनाचे लक्ष वेधून घेते. ''चला चला मुलांनो आपण वाचवू प्राणी हत्तीबाप्पा सांगे सृष्टीची कहाणी,'' अशी सुंदर ओळींची कविता प्राण्यांचे या सृष्टीशी असलेलं नाते अवगत करतात. हत्तीला बाप्पा म्हणून संबोधून या प्राण्याचे आध्यात्मिक व पौराणिक महत्व उजागर होते. संस्कृती आणि परंपरा यांचा सुरेळ मेळ येथे साधण्यात आलेला आहे.


खारूताई खारूताई
किती तुझी चपळाई

ही कविता आपल्या अवतीभवती असलेले जीवन आणि प्राण्यांचे मानवी जीवनात असलेले स्थान किती महत्वाचे आहे हे सांगते. '' तीन रेषा पाठीवर समजतात प्रभूचे आशीर्वाद त्यात सदा वसतात,'' या चरणाचा संदर्भ थेट रामायणाशी जोडलेला आहे. या अनुषंगाने हे बडबड गीत म्हणतांना आपले धार्मिक ग्रंथ, कथा,आदर्श व जीवनमूल्यांची अती कल्पकतेने मुलांना माहीती मिळते. चातुर्याने मनोरंजनाशी सांगड घातलेले हे गीत उत्कृष्ट शब्दांकन व सहजसुंदर ओघवता शैलीदार नमूना आहे, यात मुळीच शंका नाही. अशी अनेक गीते आणि कविता या संग्रहात दिसून येतात. निसर्गाची महती सांगणारी ''नीळा नीळा डोंगर, जंगलातील नदी, निसर्ग सखा ओढा, तलाव, पावसाचे थेंब, जंगलाचा नियम, राज्यवृक्ष अशा कितीतरी कविता मानवी जीवनातील असलेले निसर्गाचे स्थान व महत्व अधोरेखित करतात.

बालकवितेचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे कल्पनाशक्ती. वास्तविकतेला कल्पनेचे पंख लावून भरारी मारल्यास कविता आकर्षक आणि आशयपूर्ण होतेच तसेच बालमनाला सुध्दा कल्पनेचे धुमारे फुटतात.

चला जाऊ आपण जंगल
सफारीला
हिरव्या झाडाच्या थंड गार
सावलीला
फुलांच्या सुगंधी पायघड्या दारी
फुलपाखरे नाचती रंगीबेरंगी सारी

या कवितेच्या ओळी प्रत्यक्षात नसल्या तरी काल्पनिक जंगल सफारीला घेऊन जातात. पुढील चरणात आलेले फुलं, फुलपाखरं, खारुताई, पोपट आणि त्यानंतर असलेले वाघ, बिबट, रानगाय, हत्ती, माकड एवढचं काय जंगलातील निसर्ग आणि आकाशातील सूर्य किरण यांच विस्तृत आशयपूर्ण आणि मनोरंजक असलेले वर्णन अफलातूनच म्हणावं लागेल. बालमनाची उत्सुकता व जिज्ञासा जागृत







करणारी ही कविता संग्रहात केंद्रस्थानी असून गुणवत्ता पूर्वक दिसून येते. एकंदरीत कल्पनारम्य वातावरणाची निर्मिती करुन वास्तविकता शोधण्याचा कवियत्रीचा हा प्रयत्न स्पृहनीय आहे.

लहान मुलाकरिता कविता, कथा किंवा साहित्य निर्माण करणे ही कठीण गोष्ट आहे. विचारवंतांचे सुध्दा तसे मत आहे. नीताताई यांनी कविता लिहीतांना सर्वप्रथम बालमन आणि बालविश्व जाणून घेतले किंबहूना ती क्षमता त्यांचे मध्ये असल्याने बालकांचे मनोवृत्तीने या कविता लिहील्या गेलेल्या आहेत, हे पदोपदी जाणवते. या अनुषंगाने माकड मामा ही कविता उल्लेखनीय ठरते. माकड आणि बालक यांच नात अगदी लहानपणापासून निर्माण होती. कडेवर असतांनाच बालकाला माकडाची माहीती आई वडील आणि नातेवाईकांकडून मिळते.

झाडावरती राहतो कोण
माकड मामा त्याचे नाव
अशाप्रकारे माकडासोबत नातं
निर्माण करुन बालमानस
जोपासण्याचा कवियत्रीचा प्रयत्न
निश्चितच कौतुकास्पद आहे.
बालमनाला ही कविता अगदी
जवळची भासते ती या
कारणामुळेच हे सुध्दा तेवढेच खरे.
बालकांचे मनोवृत्तीने
लिहीलेल्या कविता बालकांनाच
काय मोठ्यांना सुध्दा भावतात.

सोबतच त्या गेयतापूर्ण असाव्यात की जेणेकरुन लवकर मुखोद्गत व्हाव्यात. शब्द सहज सुंदर सोपे आणि व्यवहारातले असावे की जेणेकरून अर्थबोध नीट व्हायला हवा. ती गुणगुणतांना मजा आणि आनंद यायला हवा. अशीच गीते किंवा कविता बालकांना आकर्षित करतात. ही बाब कवियत्रीने हेरुन लिहीलेल्या संग्रहातील कवितेमुळे काव्यसंग्रह वैशिष्टपूर्ण आणि दर्जेदार झालेला आहे. कवितेच्या रचनेवर या सर्व गोष्टींची छाप पडलेली आहे, असे निदर्शनास येते. वानगी दाखल पावसाचे थेब या कवितेमधून गेयता कशी असायला हवी याचे चित्रण बघायला मिळते

पावसाचे थेंब
टप टप पडतात
झाडांच्या पानांवर
आनंदाने नाचतात

लहान मुलांना गाणी किंवा गेयतापूर्ण कविता म्हणतांना अभिनय करावासा वाटतो किंबहूना ती एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. तसेच वर्णनात्मक अविष्कार असल्यास शारीरीक व मानसिक पातळीवर त्यामध्ये सहभागी होणं फार आवडते, मनाला भावते आणि त्याला पुरक असलेली कविता असल्यास आपसूकच ते नाचायला बागडायला लागतात. पावसाचे थेंब या कवितेमधून हेच भावविश्व साकारले गेले आहे. अतिशय कौशल्याने स्वत: त्या वातावरणात बालपणातील भुमिका वठवून कवियित्रीने सुंदर शब्दांकन केलेले आहे. तसेही भुरभुर आल्हाददायक पाऊस आणि बालपण यांचे नाते शब्दातीत व स्वप्नातीत आहे, त्यामुळे पावसाचे थेंब ही कविता लहानच काय मोठ्यांना सुध्दा एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते.

कवियित्री या शिक्षीका असल्याने बालमनाशी त्यांचा एक प्रकारचा भावनिक संबंध आलेला आहे. बालकांच्या छोट्या विश्वातील वेदना,भावना,संवेदना आणि मनोवृत्ती विषयी जागरुक आणि जाणकार आहेत. कवितेमध्ये या बाबतचे पडलेले प्रतिबींब पडल्याचे अगदी ठळकपणे पडल्याचे दिसून येते. बालसाहित्य विशेषतः कवितेचे मुख्य प्रयोजन म्हणजे मनोरंजन. मनोरंजन हा बालसाहित्याचा आत्मा आहे. त्याला प्राधान्य देऊनच इतर गुणवैशिष्ट्ये किंवा जीवनमुल्यांचे ज्ञान बालकांना देणे प्रभावशाली ठरते. कविता संग्रहामधून ही प्रतिभा प्रामुख्याने दृष्टीपथात पडते. मुलांचे भावनिक विश्व उजागर करणारा हा काव्यसंग्रह खात्रीने मुलांना सोबत पालकांना सुध्दा आनंद देऊन जाईल व अल्पावधीतच लोकप्रिय होईल हे निश्चितच आहे.

आणखी महत्वपूर्ण असलेली वैशिष्टपूर्ण बाब म्हणजे मुलं त्याचे निर्जीव खेळणी किंवा ईतर सजीव प्राण्यामध्ये मानवाचे रुप बघतात. वास्तविक पहाता प्राणी मानवासारखे बोलत नाही, खेळणी सुध्दा मूक आणि निर्जीव असतात. पण लहान मुलांना ते एकमेकाशी बोलतात, संवाद साधतात असे वाटत असते. बाल मनोवृत्तीचा तो एक अविभाज्य भाग आहे. कवियित्री नीता ताई यांचे सर्जनशील व शोधक मनाने बालमनाची ही मनोवैज्ञानिक अनुभूती '' जंगलातील गप्पागोष्टी,'' या कवितेमध्ये अतिशय सुरेख आणि सुरेल पध्दतीने नजरेसमोर आणली. खाली नमुद केलेल्या या सुंदर कवितेतील काही मजेशीर ओळी गमतीशीर तर आहेत सोबतच पशुपक्षांचे माध्यमातून काही मौलिक संदेश आणि संकेत सुध्दा उजागर करता.

चिमणी म्हणाली, चिव चिव चिव
माणसांना तुम्ही सांगा
झाडे लावा झाडे वाचवा
निसर्गाशी घेवू नका पंगा

तसेच कावळ्याचे मुखातील असलेले,''नका करू कोणी भांडण सगळे मिळून आपण आता जंगलाचे करू रक्षण,'' अशा प्रकारचे आशयपूर्ण बोल ताल सूर आणि नादमय असून अर्थपूर्ण आहेत. बालमनावर जंगल आणि निसर्ग यांचे मानवी जीवनातील महत्व अजाणता अधोरेखित करतात.

जेष्ठ साहित्यिक गणेश शिवराम भाकरे आणि प्रा. अलका गायकवाड यांनी सादर केलेल्या प्रस्तावना व शुभेच्छा या बालकवितेला लाभलेल्या आहे. निसर्गाशी मैत्री, पशुपक्षांवर प्रेम, सजीवांचा आदर तसेच संस्कार, निसर्ग प्रेम आणि संवेदनशीलता अशी अनमोल जीवनमूल्यांची शीकवण बालमनाला या काव्य संग्रहातून कविता गुणुणतच मिळेल असा विश्वास व्यक्त केलेला आहे आणि तो सार्थ सुध्दा दिसून येतो. कविता संग्रहातील सर्वच चित्रे अतिशय सुंदर आणि आकर्षक असून कवितेमधील असलेला आशय आणि विषय फुलविण्याची महत्वपूर्ण कामगीरी करतात. मुखपृष्ठ आणि संग्रहातील सुरेख चित्रे चित्रकार उध्दव शहाणे यांनी कल्पकतेने तन मन धन समर्पित करून रेखाटलेली आहे, ती कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहे.

एकंदरीत जंगल सफारी, बालकविता संग्रह ही बालमनाचे विश्व साकारलेली ओघवती आणि सहजसुंदर अर्थपूर्ण काव्य सरिता आहे. बालकांची जिज्ञासा जागविणारी अद्भूत आणि उत्कंठावर्धक अशी, कवियित्री नीता ताई यांनी साकारलेली जंगल सफारी आहे. एक वाचक म्हणून कवियत्री नीता ताई यांचे अभिनंदन करुन त्यांच्या मनभावन जंगल सफारीला मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

जंगल सफारी हा बालकविता संग्रह सहजतेने उपलब्ध आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

कविता संग्रहाचे नाव..जंगल सफारी

प्रकार.बालकविता

कवियित्री.. ॲड.डॉ. नीता प्रफुल्ल कचवे

प्रकाशक..ज्ञानपथ पब्लिकेशन अमरावती

# संत साहित्य आणि मानवी विवेक!

**ज्योतिर्मय साहित्य**

मानवी मनाला खऱ्या अर्थाने विवेकवादी बनवण्याचे श्रेय संत साहित्याला जाते. शाळा माहिती देते, शास्त्र परिभाषा देते, बाजार युक्ती देतो. पण मनाला थांबवून खरे-खोटे ओळखायला शिकवणारी वाणी संतांच्या अभंगात आहे. ज्ञानेश्वर सामान्य माणसाला गीता समजावतात. एकनाथ संस्कृतच्या मक्तेदारीला प्रश्न विचारतात. तुकाराम यंत्र-मंत्र, जडीबुटी आणि दांभिक संतवेषावर प्रहार करतात. ही भक्ती होती, पण ती आंधळी नव्हती. ती तपासणारी होती. म्हणून संतसाहित्य केवळ भक्तिवाङ्मय नाही. ते समाजाची पहिली विवेकशाळा आहे.

समाजाचे खरे प्राधान्य त्याच्या रोजच्या श्रद्धेत दिसते. जे मंत्र दररोज येतात, तेच मनात स्थिरावतात. पूजा येते, यात्रा येते, नवस येतो. सण जवळ आला की त्यांची तासिका वाढते. प्रश्न कधी कधी येतो, शंका कधी काढली जाते, आणि विवेक बहुतेक वेळा 'भक्तीनंतर' या यादीत ढकलला जातो. ग्रंथ असतात, गाथा असते, कीर्तनही असते. पण माणसाला तिथे नेणारी विचार करण्याची तासिका नसते. मग आपण आश्चर्य व्यक्त करतो की लोक अंधश्रद्धेत अडकतात. खरे कारण वेगळे आहे. जे संतांच्या वाणीत विवेकाने तपासले जात नाही, ते समाजाच्या मनातही नाही. विवेकाला जागा नसणे म्हणजे केवळ एक गुण वगळणे नव्हे. ते म्हणजे खरे-खोटे ओळखण्याच्या सवयीला अधिकृत जागा न देणे.

अनेक घरांत संतसाहित्य आहे, असे सांगितले जाते. देवघरात गाथा दाखवली जाते. नोंदवहीत अभंगांची संख्या असते. पण आठवड्यातून माणसे त्या वाणीला किती वेळ विचाराने ऐकतात, हा प्रश्न टाळला जातो. दार श्रद्धेने कुलूपबंद असते. किल्ली परंपरेत असते. कीर्तनकार अन्य कामात व्यस्त असतो. सणाच्या महिन्यात ग्रंथ शोभेचा होतो. असे संतसाहित्य अस्तित्वात आहे, पण ते जागे नाही. जागे करायचे असेल, तर त्याला जीवनात विवेकाचे स्थिर स्थान हवे. आठवड्यातून एक अभंगही नियमित आला आणि त्यावर प्रश्न पडला, तर माणसाला वाटते की हेही समाजाचे काम आहे. जे काम मानले जात नाही, ते माणूसही गांभीर्याने घेत नाही.


संतवाणीतील विवेक म्हणजे केवळ शंका नव्हे. ती समाजाची घोषणा आहे की विचार ही भक्तीइतकीच आवश्यक आहे. आजची व्यवस्था मात्र उलट संदेश देते. विधी केंद्रस्थानी, विचार कडेला. परिणामी माणूस मंत्र वाचतो, पण अभंग तपासत नाही. मंत्र भीती देते. अभंग दृष्टी देतो. पूजा संपते, दृष्टी आयुष्यभर राहते. तरीही आपण दृष्टीला वेळ देत नाही. हा विरोधाभास धार्मिक आहे तितकाच तो सांस्कृतिकही आहे.

तुकाराम म्हणतात, ''यंत्र मंत्र काय करिसी जडीबुटी। तेणे भूतसृष्टी पावशील।'' चमत्कार, जडीबुटी, भूतप्रेत यांना ते भक्ती मानत नाहीत. ''गुळें माखोनिया दगड ठेविला'' बाहेर संतवेष, आत विषयवासना. अशा दांभिकावर ते प्रहार करतात. एकनाथ सांगतात, संस्कृत ईश्वराने केली तर प्राकृत चोरांनी केली का? देव भाषेचा पक्षपाती नाही. ज्ञानेश्वर ज्ञान सामान्य माणसाच्या बोलीत आणतात. ही केवळ काव्यक्रांती नव्हती. ही मनाला स्वतंत्र करणारी कृती होती. संतांनी परंपरा फेकली नाही; त्यांनी परंपरेला प्रश्न विचारले. प्रश्न विचारणे नास्तिकपणा नव्हे. ते जागृती आहे.

पालक आणि कधी कधी पुरोहितही म्हणतात, आधी श्रद्धा होऊ दे, विवेक नंतर. या 'नंतर' चा दिवस येत नाही. कारण श्रद्धा संपत नाही. नवस येतो, ग्रहण लागते, उपाय दिसतो. विवेकासाठी उरलेली जागा भीती व्यापते. समाजाने विवेकाला अधिकृत वाणी दिली नाही, तर घर ते काम करणार नाही. घर चमत्कार शोधते. समाज जर स्वतः विचाराला दुय्यम मानत असेल, तर माणूस ते कसे मुख्य मानील? म्हणून संतवाणीतील विवेक ही केवळ भक्तासाठी नाही; ती समाजाच्या प्राधान्यक्रमाला दुरुस्त करणारी कृती आहे.




काहीजण म्हणतील, भक्ती आधीच मोठी आहे, आणखी विवेकाची तासिका कुठून आणायची. प्रश्न नवी तासिका शोधण्याचा आहे, की जुनी भीतीची घाई कमी करण्याचा आहे. वर्षभर विधी संपवून शेवटी माणूस थकतो आणि विसरतो. आठवड्यात एक अभंग विचाराने ऐकल्याने धर्म कोसळत नाही. उलट भाषा समजते, भीती कमी होते, तारतम्य येते. विज्ञान वाचणारा मुल संकल्पना लवकर धरतो. अभंग



तपासणारा माणूस केवळ मंत्र पाठ करत नाही, संदर्भ शोधतो. म्हणजे संतसाहित्य श्रद्धेला अडथळा नाही. ते श्रद्धेला जिवंत करते.

तुकाराम दैववाद नाकारतात, प्रयत्नवाद सांगतात. ढोंगी साधू, सोवळे-ओवळे, मरणोत्तर मुक्तीची घाबरगुंडी, जातिभिमान या सगळ्यांवर त्यांची वाणी टोकदार आहे. ते सांगतात, कोणी सांगितले म्हणून खरे मानू नका; विवेकी बुद्धीने पारखा. मनाला अंकुश हवा, नित्य नवा दिवस जागृतीचा हवा. ही वाक्ये आजही अस्वस्थ करतात कारण ती सोयीस्कर नाहीत. सोयीस्कर भक्ती चमत्कार मागते. विवेकी भक्ती आचरण मागते.

संतसाहित्यातील विवेक म्हणजे मंदिरात बसवून शंका काढणे नव्हे. तो म्हणजे निवड, ऐकणे आणि थोडा संवाद. छोटा मुल ओवी ऐको, पण विचारू शकतो. मोठा माणूस अभंग निवडो, पण दांभिकता ओळखू शकतो. शिक्षक किंवा कीर्तनकार दिशा देवो, पण उत्तर लादू नये. आठवड्याच्या शेवटी एकाने सांगावे की काय समजले आणि काय पटले नाही. पुण्यासाठी नाही, समजण्यासाठी. असा विवेक बोजा होत नाही. तो विश्रांतीसारखा वाटतो, पण त्यात जागृती दडलेली असते. जागृती घाईत दिसत नाही. ती सवयीत दिसते.

कीर्तनकाराला या वाणीचा केंद्रबिंदू मानावे. तो केवळ ग्रंथ मोजणारा नसावा. तो माणसाला प्रश्न विचारायला शिकवणारा साथीदार असावा. प्रश्न नाही पडला की माणूस कपाटाकडे पाठ फिरवतो. प्रश्न पडला की तो पुन्हा येतो. पुन्हा येणे हेच संतसाहित्याचे यश आहे. यश मोजायचे असेल, तर किती ग्रंथ आहेत इतकेच नव्हे; किती अभंगांनी माणसाला जागे केले, हे पाहावे. तासिका नसेल तर मोजमापही नसते, आणि नसेल तर जबाबदारीही नसते.

एकनाथांची भारुडे सामान्य बोलीत समाजाला आरसा दाखवतात. तुकारामांचे अभंग पाखंडावर प्रहार करतात. ज्ञानेश्वरी ज्ञान तळागाळापर्यंत नेते. चोखामेळा, जनाबाई, नामदेव यांची वाणी सांगते की देव जात पाहत नाही, हृदय पाहतो. ही केवळ समता नव्हती. ही विवेकाची समता होती. ज्या व्यवस्थेला प्रश्न विचारता येत नाही, ती व्यवस्था पवित्र नाही; ती केवळ मजबूत आहे. आता सर्व संत साहित्य माहिती ऑनलाइन आहे, हे खरे. पण माहिती आणि विवेक वेगळे आहेत. पडदा खंडित करतो, सूचना येतात, नजर उडते. चमत्कारांच्या व्हिडिओंची गर्दी होते. अभंग मात्र एका प्रवाहात ठेवतो आणि प्रश्न विचारायला भाग पाडतो. ही एकाग्रता आज दुर्मीळ झाली आहे. समाजाने ती आणखी दुर्लक्षित करू नये. डिजिटल साधने उपयोगाची आहेत. पण त्यांनी संतवाणी पुसून टाकायची नाही. उलट गाथा आणि प्रश्न एकत्र येऊ शकतात. मूलभूत गोष्ट मात्र तीच राहते माणसाला विचार करण्यासाठी निश्चित वेळ हवा.

ग्रामीण गावात हा प्रश्न अधिक तीव्र आहे. बाहेर वैज्ञानिक दृष्टिकोन पोहोचत नाही, घरची पुस्तके नसतात, आणि संतांची वाणीच एकमेव दरवाजा असतो. तो दरवाजा केवळ भीतीने उघडला तर मुल केवळ नवसापुरता मर्यादित राहतो. ही विषमता सुंदर भाषेत दिसत नाही. ती कल्पनेत दिसते. ज्या मुलाने अभंग विचाराने ऐकला नाही, त्याला जग जादूचे वाटते. जादूचे जग म्हणजे भीतीचे स्वप्न. भीतीचे स्वप्न म्हणजे संकुचित भविष्य. म्हणून संतवाणीतील विवेक ही सांस्कृतिक गोष्ट नसून स्वातंत्र्याची गोष्ट आहे.

आजही ग्रहणाच्या नावावर घाबरगुंडी होते, जातीच्या नावावर अस्पृश्यता चालते, चमत्कारांच्या नावावर लूट होते. संतांनी शेकडो वर्षांपूर्वी जे सांगितले, ते आजही अपुरे पडते कारण आपण ते गातो पण तपासत नाही. गाणे श्रद्धा दाखवते. तपासणे विवेक दाखवते. दोन्ही एकत्र आली तर संतसाहित्य जिवंत होते. एक सुटी राहिली तर ते सजावट होते.

समाज माणसाला काय देतो, हे भाषणातून कळत नाही. ते त्याच्या रोजच्या श्रद्धेतून कळते. संतवाणी हे समाजाचे प्रामाणिक आत्मकथन आहे. त्यात विवेक नाही, तर समाज सांगतो की विचार अनिवार्य नाही. मग माणूसही तेच शिकतो. तो पूजा करतो, प्रमाणपत्र घेतो, पण प्रश्नांची भूक त्याला लागलेली नसते. असे धर्म पूर्ण दिसते, पण ते पोकळ असते.

मानवी मनाला विवेकवादी बनवण्याचे श्रेय संतसाहित्याला जाते, हे वाक्य केवळ स्तुती नसावे. ते जबाबदारी असावी. संतसाहित्याला विवेकाची तासिका देणे म्हणजे एक कप्पा रंगवणे नव्हे. ते म्हणजे माणसाला थांबायला, तपासायला आणि स्वतःच्या गतीने समजून घ्यायला अधिकृत वेळ देणे. ही वेळ वाया जात नाही. ती भीती कमी करते, तारतम्य वाढवते, दांभिकता ओळखायला शिकवते आणि माणसाला कर्मकांडापलीकडचे जग दाखवते. असे जग न दिसले, तर समाज माहिती देतो; नागरिक मात्र घडवत नाही. म्हणून आता प्रश्न मंदिर बांधण्याचा राहिलेला नाही. अनेक ठिकाणी देवालय आहे. प्रश्न आहे ती वाणी विचाराने ऐकण्याचा. जी गोष्ट आठवड्याच्या रचनेत नाही, ती समाजाच्या संकल्पनेतही नाही. विवेकाला संकल्पनेत स्थान द्यायचे असेल, तर त्याला अभंगात स्थान द्यावे. विवेक आला की संतसाहित्य जागे होते. संतसाहित्य जागे झाले की माणूस केवळ मंत्र पाठ करणारा राहत नाही; तो प्रश्न आणि तारतम्य घेऊन वाढतो. ही वाढ गुणपत्रिकेत लगेच दिसणार नाही. पण ती माणसाच्या आयुष्यात दिसेल. समाजाने ती वाढ भीतीअभावी पुन्हा हरवू नये.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# ॥ज्योतिर्मय॥ दीपावली - 2026

## आनंदाचे डोही आनंद तरंग....

प्रकाशन 20 ऑक्टोबर 2026 विजया दशमी च्या मुहूर्तावर

दीपावली हिंदू मनामनातील सर्वात मोठा सण. दीपावली म्हणजे सर्वत्र आनंदी आनंद गडे, दीपावली हा असा सण आहे की लहान थोरापासून ते आजोबा आज्जी पर्यत सर्वच आनंदाने उजळून निघतात. सर्वत्र प्रसन्न वातावरण, फराळाची रेलचेल, नवीन कपडे, नवीन खरेदी, नवीन प्रकल्प, नवीन योजना, नवे मित्र-मैत्रिणी, सुट्टीची धमाल, आणि वाचनीय दिवाळी अंक हे अनेक वर्षापासून चालत आलेलं न बदललेलं एक सुखाचं समीकरण.

बदलत्या आधुनिकीकरणाने खूप साऱ्या गोष्टी बदलत आहेत, बद्दलले आहेत पण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो सर्व भारतीय संपूर्ण जगात अतिशय उत्साहात साजरा करतात.

दिवाळी आणि दिवाळी अंक हे समीकरण शेकडो. वर्षापासून चालत आलेलं आहे आणि ते अखंड चाल्तं राहणार, कारण दिवाळी अंकाशिवाय दिवाळी अधुरी आहे.

"ज्योतिर्मय दीपावळी" या नावातच सर्व काही सामावलेलं आहे, साहित्यांनी नटलेला संपूर्ण कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी या अंकात खूप काही असणार आहे.

त्यासाठी ज्योतिर्मय साहित्यच्या सर्व साहित्यिकांना आवाहन आहे की त्यांनी त्यांचे दर्जेदार साहित्य 15 सप्टेंबर 2026 पर्यंत - sanjayvyapari@gmaii.com या ई-मेल आयडीवर किंवा 7743818559 या व्हाट्सअप वर पाठवावे.

- तुमच्या साहित्यावर "ज्योतिर्मय दीपावली" करिता लेख, किंवा कविता अशा स्पष्ट उल्लेख करावा.
- प्रत्येक साहित्यिक एक आर्टिकल व एक कविता पाठवू शकतो किंवा फक्त दोन कविता पाठवू शकतो.
- साहित्यावर लेखकाचा संपूर्ण पत्ता, पिनकोडसह असणे आवश्यक आहे.

### दिवाळी अंकासाठी विषय

1. मोबाईलचा अतिरेक
   (उप विषय)
   1. मोबाईलचा लहान मुलांवर होणारा परिणाम
   2. मोबाईलचा तरुण वर्गावर होणारा परिणाम
   3. स्क्रीन टाईम किती असावा
   4. वाहनात किंवा वाहनावर मोबाईल वापरणे धोक्याचे.
   5. मोबाईलमुळे एकटेपणा वाढला.
   6. मोबाईल संदर्भात कोणताही विषय
2. भारतीय सण
   (उप विषय)
   1. भारतीय सण आणि त्यामागील भूमिका
   2. सण - माणसांना जोडणारा दुवा
   3. मंदिरे आणि व्यवसायीकरण
3. माझे आठवणीतील पर्यटन
4. A I प्रणाली - फायदे / तोटे
5. देव माणसातच आहे
6. शाळेतील आठवणी
7. आज्जी आजोबांच्या गोष्टी हरवल्या
8. संस्काराचे महत्व
9. बाल साहित्य
10. इतर कोणताही सकारात्मक विषय

दिवाळी अंक प्रकाशनापूर्वीच पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.
एका अंकासाठी ₹.500 व त्यापेक्षा जास्त अंकासाठी पुढील प्रत्येक अंकासाठी + ₹300 रुपये पडतील.
दिवाळी अंकाचे पेमेंट 100 टक्के ॲडव्हान्स लागेल.

### पेमेंट पाठवण्याची माहिती

ज्योतिर्मय प्रकाशन
ऑनलाईन फोन पे नंबर
पे 7743818559
या नंबरवर पाठवावे व पेमेंट पाठवल्याचा स्क्रीनशॉट त्याच व्हाट्सअप नंबरवर पाठवावा.

सर्वांना लेखनासाठी खूपखूप शुभेच्छा!

- संपादक,
**ज्योतिर्मय दीपावली**
पुणे | छ. संभाजीनगर
मो. 7743918559, 7743818559

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559